दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ३ । सोमवार १२ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




# शिवसेना भवनाबाहेर तुफान राडा

## सीजेपीच्या समर्थनार्थ युवासेनेचे आंदोलन पोलिसांची गाडी अडवून कार्यकर्त्यांच्या सुटकेसाठी ठाकरेंची आक्रमक भूमिका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : नवी दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क परिसरात आंदोलनाची हाक देणाऱ्या सीजेपीला पाठिंबा देण्यासाठी युवासेनेने शिवसेना भवनाबाहेर आंदोलन करण्याची तयारी केली होती. मात्र, पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारल्याने आणि आंदोलकांची धरपकड सुरू केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.**

यावेळी पोलिसांनी शिवसेना भवनात घुसण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला. या घटनेनंतर जोरदार बाचाबाची झाली. दरम्यान, पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शिवसैनिकांची सुटका करण्यासाठी आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे रस्त्यावर उतरले. त्यांनी पोलिसांची गाडी अडवून कार्यकर्त्यांना सोडल्याशिवाय गाडी पुढे जाऊ देणार नसल्याची भूमिका घेतली.

सीजेपीच्या समर्थनार्थ युवासेनेकडून शिवसेना भवनाबाहेर आंदोलन करण्यात येणार होते. यासाठी युवासेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते परिसरात जमा होत असतानाच पोलिसांनी धरपकड सुरू केली. त्यामुळे शिवसैनिक आणि पोलिसांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांनी शिवसेना भवनात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला असून, या घटनेमुळे दादर परिसरात गोंधळ उडाला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी शिवसेना भवनाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. वरिष्ठ पोलीस अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शिवसैनिकांना घेऊन जाणारी गाडी अडवण्यासाठी आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे पुढे आले. **(पान ४ वर)**



### ‘शिवसेना भवनात घुसण्याचा प्रयत्न करू नका’
आमदार महेश सावंत यांनी पोलिसांच्या कारवाईवर तीव्र आक्षेप घेतला. शिवसेना भवन ही आमची खासगी जागा आहे. येथे घुसण्याचा प्रयत्न करू नका, अशी सक्त ताकीद आम्ही पोलिसांना दिली आहे, असे ते म्हणाले. आंदोलनात सहभागी नसलेल्या नागरिकांनाही ताब्यात घेतले जात असल्याचा आरोप करत, जे खरोखर आंदोलन करत आहेत, त्यांनाच ताब्यात घ्या, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### ‘मतदानाचा अधिकार हिरावला जात असल्याचा आरोप’
देशातील लोकशाही आणि मतदानाच्या अधिकारावरून सरकारविरोधात जनतेमध्ये नाराजी असल्याचा दावा महेश सावंत यांनी केला. मतदानाच्या अधिकारावर गदा आणली जात असल्याच्या मुद्द्यावरून लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करत असल्याचे ते म्हणाले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील आंदोलनाचा संदर्भ देत त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. देशात हुकूमशाही सुरू झाली आहे, अशी टीका करत सावंत यांनी आंदोलन सुरूच राहणार असल्याचे संकेत दिले.

---

## जामखेडच्या कला केंद्रांच्या वादातून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न..!

### जामखेडमधील कला केंद्रे बंद करण्यासाठी आजबेंचे अमरण उपोषण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेडमधील कला केंद्रे बंद करावीत, या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नितीन दत्तात्रय आजबे (रा. जामखेड) याने स्वतः च्या अंगावर डिझेलसदृश ज्वलनशील पदार्थ ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. ही घटना ९ ऑक्टोबर रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी तत्परता दाखवत या व्यक्तीला वेळीच रोखल्याने मोठा अनर्थ टळला. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जामखेड येथील सचिन आजबे यांनी जामखेडमधील कला केंद्रे बंद करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाने तातडीने मागणी मान्य करावी, यासाठी त्यांचा भाऊ नितीन आजबे यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्या पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दुपारच्या सुमारास नितीन यांनी स्वतःकडील हिरव्या रंगाच्या ड्रममधील ज्वलनशील द्रव अंगावर ओतून घेतले. मात्र, पोलिसांनी तातडीने धाव घेत त्यांना ताब्यात घेतले.याप्रकरणी जामखेड पोलिस ठाण्यातील कर्मचारी ईश्वरसिंग परदेशी (वय ३८) यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम २८७ आणि २२६ अन्वये नितीन आजबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार चांगदेव आंधळे करीत आहेत.

#### आश्वासनांनंतरही कारवाई नाही
या अगोदरही मी उपोषण केले होते. त्यावेळी केवळ आश्वासन देऊन उपोषण स्थगित करण्यास भाग पाडले. परंतु, जामखेडमधील एकाही कला केंद्रावर कारवाई झाली नाही. त्यामुळे पुन्हा उपोषणाला बसलो आहे. कला केंद्रांमुळे अनेक संसार उद्ध्वस्त होऊन काहींनी आत्महत्या केल्या आहेत. शासनाने लवकरात लवकर कारवाई करावी.

**– सचिन आजबे, उपोषणकर्ते**



## मतचोरी, एसआयआरविरोधात विरोधकांचा उद्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा

### राहुल गांधींची घोषणा; सरन्यायाधीशांना निवेदन देणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** कथित मतचोरी, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला (एसआयआर) विरोध आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून दिल्लीतील राजकीय वातावरण तापले आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी, १२ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चानंतर सरन्यायाधीशांना निवेदन देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांनी हातात संविधान घेऊन व्हिडीओ प्रसिद्ध करत लोकशाही आणि संविधानावर विश्वास असलेल्या नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. शनिवारी दिल्लीत शांततेत आंदोलन करणाऱ्या तरुणांवर पोलिसांनी बळाचा वापर केल्याचा आरोपही त्यांनी केला. शांततेने विरोध करणाऱ्या तरुणांना अशी वागणूक मिळणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले.या मोर्चाद्वारे मतदार याद्यांमधील कथित गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, एसआयआर प्रक्रिया थांबवावी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे, अशा मागण्या करण्यात येणार आहेत.राजकीय पक्ष, जात, धर्म, राज्य आणि स्त्री-पुरुष असा कोणताही भेद न ठेवता सर्वांनी भारतीय म्हणून एकत्र यावे, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले आहे. दरम्यान, या आंदोलनामुळे केंद्र सरकार आणि विरोधकांमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

---

## नेवासा–श्रीरामपूर मार्गावर तीन दुचाकींची भीषण धडक; दोघांचा मृत्यू, पाच गंभीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा–श्रीरामपूर** राज्य मार्गावरील एस कॉर्नर येथे तीन दुचाकींचा भीषण अपघात होऊन दोघांचा मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. रविवारी (दि. ११) पहाटे ही हृदयद्रावक घटना घडली. मृतांमध्ये नाशिक येथील स्वाती जाधव आणि श्रीरामपूर येथील गणेश गायकवाड यांचा समावेश आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एस कॉर्नर परिसरात तीन दुचाकींचा अपघात झाला. या अपघातात दुचाकींवरील सात जण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक विकास निपुंगे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांनी जखमींना नेवासे फाटा येथील रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर दोघांना मृत घोषित केले.

या अपघातात विशाल शंकर गुंजाळ, यश समाधान पडघन, ऋषिकेश घोडे आणि श्रावणी संतोष जाधव हे नाशिक येथील, तर ओम पोपट परदेशी हा श्रीरामपूर येथील रहिवासी जखमी झाला आहे. पाचही



जणांवर नेवासे फाटा येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, मृत स्वाती जाधव आणि गणेश गायकवाड यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. नेवासा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

एस कॉर्नर परिसरात झालेल्या या भीषण अपघातामुळे राज्य मार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दोन जणांचा मृत्यू आणि पाच जण गंभीर जखमी झाल्याने मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणी

### मुंबईत ३०० आंदोलकांवर गुन्हे दाखल होणार

#### अमित ठाकरे, आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांच्या भूमिकेकडे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईतील शिवाजी पार्क परिसरात झालेल्या आंदोलनानंतर मुंबई पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सीजेपी, ठाकरे गटाची शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि इतर संघटनांच्या कार्यकर्त्यांचा यामध्ये समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मनसे नेते अमित ठाकरे आणि शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्यावरही गुन्हा दाखल होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी नवी दिल्लीत सीजेपीकडून आंदोलन सुरू आहे. त्यापूर्वी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीनेही आंदोलन केले होते.




याच पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील शिवाजी पार्क येथे आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र, या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी **(पान ४ वर)**

#### अमित ठाकरे, आदित्य ठाकरे रस्त्यावर
**मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळताच अमित ठाकरे यांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांना जाब विचारला. मनसे पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांच्या अटकेला विरोध केला. दुसरीकडे, युवा सेनेच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यानंतर आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांनीही हस्तक्षेप केला. आदित्य ठाकरे यांनी पोलिसांचे वाहन अडवत कार्यकर्त्यांची सुटका होईपर्यंत गाडी जाऊ देणार नसल्याची भूमिका घेतली.**

---

## देवीच्या उत्सवातही राजकारणाचा शिरकाव!

### गावोगावी नवरात्रोत्सवाचा जल्लोष; कुठे दोन ज्योती, तर कुठे मानपानावरून गटबाजी

#### आराध्यांची कमाल, युवकांची धमाल; ‘रंगा-बिल्ला’ चर्चेनेही गावोगावी राजकीय रंगत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** गावोगावी देवीचा जयघोष, रात्रीचा जागर, ज्योत स्वागताच्या मिरवणुका आणि युवकांचा उत्साह अशा भक्तिमय वातावरणात श्रीगोंदा तालुक्यात शारदीय नवरात्रोत्सवाला रंग चढला आहे. मात्र, जिथे श्रद्धेचा जागर व्हायला हवा, तिथे काही गावांत राजकीय वर्चस्वाची स्पर्धा रंगत असल्याचे चित्र आहे. कुठे देवीच्या ज्योती दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून आणल्या जात आहेत, तर कुठे मानपान, नियोजन आणि श्रेयावरून मतभेदांची चर्चा आहे. त्यामुळे देवीचा उत्सव भक्तीचा की राजकीय प्रतिष्ठेचा? असा सवाल उपस्थित होत आहे.




घटस्थापनेसाठी देवीची ज्योत वेळेत गावात पोहोचावी, यासाठी युवक रात्रभर जागरण करून धावपळ करीत आहेत. ज्योत दाखल होताच जल्लोषात स्वागत मिरवणुका काढल्या जात आहेत. मंदिरांना रंगरंगोटी, आकर्षक सजावट आणि विविध रंगांच्या विद्युत रोषणाईने सजविण्यात आले आहे. आराध्यांची मेहनत आणि तरुणाईचा उत्साह यामुळे नवरात्रोत्सवाची रंगत वाढली आहे. मात्र, या उत्साहाला काही ठिकाणी राजकीय गटबाजीची किनार लाभत असल्याने चर्चेला उधाण आले आहे.

‘सर्व काही आम्हीच करणार’ भूमिकेवर नाराजी

काही गावांत उत्सवाच्या नियोजनात आपलेच वर्चस्व राहावे, यासाठी प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे. स्थानिक राजकीय समीकरणे, मानपान आणि श्रेयवाद यांचा धार्मिक कार्यक्रमांवरही परिणाम होत असल्याचे बोलले जात आहे.

‘रंगा-बिल्ला’ असा स्थानिक पातळीवर उल्लेख होणाऱ्या जोडीच्या संदर्भातूनही राजकीय वर्चस्वाची चर्चा रंगत आहे. मात्र, कोणत्याही व्यक्तीपेक्षा गावाचा उत्सव आणि ग्रामस्थांची एकजूट महत्त्वाची, अशी भूमिका तरुणांकडून घेतली जात असल्याचे चित्र काही ठिकाणी दिसत आहे.

काही ठिकाणी मंदिरांच्या सजावटीकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा असताना दुसरीकडे राजकीय गट आपापल्या पद्धतीने उत्सव साजरा करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे एकाच गावातील धार्मिक उत्सवातही एकजुटीऐवजी गटागटांचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

देवीच्या दरबारात तरी गटबाजीला थारा नको!

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून गावाच्या एकोप्याचे आणि सामूहिक सहभागाचे प्रतीक आहे. अशा उत्सवात राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येणे अपेक्षित असते. मात्र, प्रतिष्ठा, मानपान आणि वर्चस्वाच्या स्पर्धेमुळे उत्सवाला राजकीय रंग चढत असेल, तर त्याचा फेरविचार करण्याची गरज आहे.

देवीच्या नावाने एकत्र येणाऱ्या गावांमध्ये उत्सवाच्या निमित्ताने दुरावा निर्माण होऊ नये, एवढीच अपेक्षा! युवकांचा उत्साह, आराध्यांची मेहनत आणि भाविकांची श्रद्धा यांना राजकीय स्पर्धेची जोड लागण्याऐवजी गावाच्या एकजुटीचे बळ मिळणार का, हा प्रश्न यंदाच्या नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने चर्चेत आला आहे.

# मतदार यादीचा खेळ की लोकशाहीचा मेळ?

लोकशाहीत सत्ता बदलते, सरकारे येतात आणि जातात; पण मतदाराचा मतदानावरील विश्वास टिकला पाहिजे. कारण लोकशाहीचा खरा मालक कोणताही राजकीय पक्ष नसून सामान्य मतदार आहे. त्याच्या एका मतातून सरकारे निर्माण होतात आणि त्याच मतातून सत्ताधाऱ्यांना पायउतारही व्हावे लागते. त्यामुळे मतदार यादी ही केवळ सरकारी कागदपत्रांची नोंद नसून लोकशाहीच्या पायाचा मजबूत दुवा आहे. याच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेवरून आज महाराष्ट्रापासून दिल्लीपर्यंत राजकीय संघर्ष पेटला आहे. प्रश्न केवळ विरोधकांच्या आंदोलनाचा नाही; तर निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्याचा आहे.

एसआयआरच्या विरोधात विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येत मुंबईत मोर्चा काढला. मतदार यादीतील कथित अनियमितता, निवडणूक आयोगाची भूमिका आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी या आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे. काँग्रेससह विरोधी पक्षांनी दिल्लीतील निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढला. राहुल गांधी यांनी १२ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. दरम्यान, सीजेपीच्या आंदोलनामुळेही दिल्लीतील वातावरण तापले असून आंदोलकांना ताब्यात घेण्याच्या पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या आंदोलनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, मतदार यादीच्या प्रक्रियेबाबत राजकीय आणि सार्वजनिक पातळीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, आरोप झाले म्हणजे गैरप्रकार सिद्ध झाला असे नाही; त्याचप्रमाणे निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे म्हणून तिच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्नच उपस्थित करू नयेत, असेही नाही. लोकशाहीत आरोपांची निष्पक्ष चौकशी, पुराव्यांची पडताळणी आणि निर्णयांची पारदर्शकता या तिन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

एसआयआरच्या प्रक्रियेबाबत वाद अधिक गंभीर होण्याचे कारण म्हणजे निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेदांविषयी समोर आलेली माहिती. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी एसआयआरसंदर्भातील काही निर्णयांवर गेल्या दहा महिन्यांत किमान १४ वेळा आक्षेप नोंदवल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. काही निर्णय त्यांच्या माहितीशिवाय किंवा शिफारशीशिवाय घेतले गेल्याचा मुद्दा उपस्थित झाला. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने या पत्रव्यवहाराचा धोरणात्मक किंवा माहिती-तंत्रज्ञानविषयक निर्णयांशी संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणाचा दावा खरा, याचा निर्णय राजकीय आरोपांवर नव्हे, तर कागदपत्रे आणि स्वतंत्र तपासणीवर व्हायला हवा.

महाराष्ट्रातही एसआयआर प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आहेत. मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया, मतदान केंद्रांच्या पुनर्रचनेचे निकष, संबंधित निर्णयांची कागदपत्रे आणि निवडणूक आयोगाच्या डिजिटल प्रणालीविषयी प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. काही याचिकाकर्त्यांनी वगळलेल्या मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट करण्याची, तर काहींनी एसआयआरचे निर्देश रद्द करण्याची मागणी केली आहे. या याचिकांवरील आरोप अद्याप न्यायालयीन परीक्षणाच्या अधीन आहेत. म्हणूनच त्यांना सिद्ध तथ्य मानता येणार नाही; परंतु न्यायालयात प्रश्न उपस्थित होण्याइतकी परिस्थिती निर्माण झाली असेल, तर आयोगाने शंका दूर करण्यासाठी अधिक पारदर्शकता दाखवणे आवश्यक आहे.

दिल्लीतील आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेली धरपकड, बॅरिकेड्स आणि इंटरनेट सेवांवरील निर्बंध यांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने ११ ऑक्टोबर रोजी निर्देश दिले. कायदेशीर आधार नसताना बॅरिकेड्स लावण्याचा फेरविचार करावा, इंटरनेट सेवा आणि वाहतूक सुरळीत ठेवावी, तसेच कायदेशीर प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय कोणालाही ताब्यात घेऊ नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले. शांततापूर्ण आणि नि:शस्त्र जमावाबाबतही कायद्याच्या चौकटीत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

या आदेशाचा अर्थ एसआयआर बेकायदेशीर ठरला किंवा विरोधकांचे सर्व आरोप न्यायालयाने मान्य केले, असा होत नाही. न्यायालयाने आंदोलन हाताळताना कायद्याचे पालन आणि नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण यांवर भर दिला. हाच या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा आहे. सरकार कोणतेही असो, पोलिसांना कायद्याच्या चौकटीबाहेर जाण्याची मुभा असू शकत नाही. आंदोलनकर्त्यांनीही कायदा हातात घेऊ नये; पण शांततापूर्ण निषेधाचा अधिकार केवळ प्रशासनाच्या नाराजीमुळे संपुष्टात येत नाही.

मतदार यादी अचूक असावी, मृत व्यक्तींची नावे वगळली जावीत, स्थलांतरित मतदारांच्या नोंदी दुरुस्त व्हाव्यात आणि पात्र नसलेल्या नोंदींची पडताळणी व्हावी, या उद्देशांना तत्त्वतः विरोध असण्याचे कारण नाही. निवडणूक आयोगाची भूमिका अशी आहे की मतदार याद्यांची शुद्धता राखण्यासाठी विशेष पुनरीक्षण आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील एसआयआरची कायदेशीर वैधता कायम ठेवताना प्रक्रियात्मक संरक्षण आणि पात्र मतदारांचा समावेश यांचे महत्त्वही अधोरेखित केले होते. मात्र, बिहारमधील त्या निर्णयाचा आधार घेऊन महाराष्ट्रातील प्रत्येक आक्षेप आपोआप निकाली निघाला, असे मानता येणार नाही. प्रत्येक राज्यातील तथ्ये आणि प्रक्रियेची अंमलबजावणी तपासावी लागेल.

खरा प्रश्न इथेच आहे. मतदार यादी स्वच्छ करण्याच्या नावाखाली एकाही पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाणार नाही, याची हमी कोण देणार? ग्रामीण भागातील मजूर, स्थलांतरित कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक आणि आवश्यक कागदपत्रे मिळवताना अडचणी येणाऱ्या नागरिकांचे काय? कागदपत्रांतील किरकोळ त्रुटीमुळे एखाद्या पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क धोक्यात येणार असेल, तर ती प्रक्रिया पुन्हा तपासलीच पाहिजे. मतदाराची ओळख पडताळणे आवश्यक आहे; पण पडताळणीच्या नावाखाली पात्र मतदाराला व्यवस्थेच्या दारात उभे ठेवणे लोकशाहीला परवडणारे नाही.

यासाठी निवडणूक आयोगाने मतदारांची नावे का वगळली, कोणत्या निकषांवर वगळली, आक्षेप नोंदवण्याची संधी किती दिली आणि चुकीने वगळलेल्या नावांच्या पुनर्समावेशासाठी काय व्यवस्था केली, याची स्पष्ट माहिती सार्वजनिक करावी. प्रत्येक मतदाराला स्वतःचे नाव तपासण्याची, त्रुटी दुरुस्त करण्याची आणि निर्णयाविरोधात दाद मागण्याची सोपी संधी मिळाली पाहिजे. केवळ संकेतस्थळावर माहिती टाकणे म्हणजे पारदर्शकता नव्हे; ती माहिती सामान्य नागरिकाला समजेल आणि वापरता येईल, अशी व्यवस्था असणे महत्त्वाचे आहे. विरोधकांनीही या प्रश्नाकडे केवळ सत्ताधाऱ्यांना घेरण्याची राजकीय संधी म्हणून पाहू नये. मतचोरीचे आरोप करायचे असतील, तर त्यामागील पुरावे जनतेसमोर ठेवावेत. चुकीच्या नोंदी, संशयास्पद बदल किंवा पात्र मतदारांची वगळलेली नावे यांचा तपशील सादर करावा. संसद, न्यायालये आणि निवडणूक आयोगासमोर ठोस मुद्दे मांडावेत. आंदोलन हा लोकशाहीतील महत्त्वाचा मार्ग असला, तरी अंतिम उत्तर पुरावे, निष्पक्ष चौकशी आणि कायदेशीर निर्णयातूनच मिळणार आहे.

सत्ताधाऱ्यांनीही विरोधकांच्या प्रत्येक आक्षेपाला राजकीय स्टंट म्हणून झटकून टाकणे टाळावे. निवडणूक आयोगाची स्वायत्तता ही सरकारच्या सोयीची बाब नाही; ती घटनात्मक जबाबदारी आहे. आयोगाच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित होणे ही संस्थेची बदनामी ठरत नाही. उलट, प्रश्नांना पारदर्शक उत्तरे देणे हेच संस्थेवरील विश्वास मजबूत करण्याचे साधन आहे.

लोकशाहीत मतदाराचे नाव यादीत असणे ही केवळ प्रशासकीय बाब नाही; तो त्याच्या नागरिकत्वाच्या सहभागाचा आणि राजकीय अस्तित्वाचा महत्त्वाचा आधार आहे. एका मताने सत्तेची समीकरणे बदलू शकतात, म्हणून त्या मतापर्यंत पोहोचण्याचा मार्ग निष्पक्ष असणे गरजेचे आहे.

मतदार यादी शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत एकही पात्र मतदार वंचित राहू नये आणि एकाही अपात्र नोंदीला संरक्षण मिळू नये, हीच खरी कसोटी आहे. सरकारने पारदर्शकता दाखवावी, निवडणूक आयोगाने प्रत्येक शंकेला तथ्यांसह उत्तर द्यावे, विरोधकांनी पुरावे मांडावेत आणि न्यायालयाने कायद्याच्या चौकटीत योग्य परीक्षण करावे. लोकशाहीचा विजय कोणत्याही पक्षाच्या विजयात नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचे मत सुरक्षित राहण्यात असतो.

## शेरी चिखलठाणमध्ये शेतकरी कुटुंबावर ४० ते ५० जणांच्या जमावाचा हल्ला ?

### वृद्ध आईला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील शेरी चिखलठाण येथे जमिनीच्या वादातून शेतकरी कुटुंबावर ४० ते ५० जणांच्या जमावाने हल्ला केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात वृद्ध आईसह कुटुंबातील सदस्यांना मारहाण करण्यात आली, तसेच महिलांच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने ओरबाडून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी नानासाहेब गेणू काकडे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, ९ ऑक्टोबर रोजी दुपारी एकच्या सुमारास काकडे कुटुंबीय घरात असताना पाच पिकअप वाहने आणि एका काळ्या स्कॉर्पिओमधून महिला व पुरुषांचा जमाव तेथे आला. जमावातील व्यक्तींनी लोखंडी रॉड, बांबू, काठ्या आणि लाकडी दांडक्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे.

या हल्ल्यात नानासाहेब काकडे यांच्या आई इंदुबाई गेणू काकडे यांच्या डोक्यात दांडक्याने मारल्याने त्या रक्तबंबाळ होऊन खाली पडल्या. त्यानंतरही त्यांना मारहाण करण्यात आली. केसांना धरून ओढत नेऊन त्यांच्या डोक्यावर पाणी ओतण्यात आले, तसेच पाण्याने भरलेल्या टिंबात त्यांचे डोके बुडविल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

नानासाहेब काकडे यांना वाचवण्यासाठी पुढे आलेल्या त्यांच्या मुलाला आणि भावालाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांनी पाय, कंबर व पाठीवर वार करून जखमी केल्याचा आरोप आहे. काकडे यांच्या पत्नीलाही मारहाण करून त्यांच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने ओरबाडून नेल्याचे, तसेच इंदुबाई यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोन्याची पोत तोडून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

हल्लेखोरांपैकी काही जण राजू शेटे, श्याम गाढे, पोपट पोटे आणि महेश टेकाळे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत जमिनीवर ताबा घेतल्याचे सांगत होते, असा दावाही फिर्यादींनी केला आहे. जखमी व्यक्तींना चित्रदूरध्वनीद्वारे दाखविल्याचा तसेच जमिनीवरून निघून जाण्याच्या धमक्या दिल्याचाही आरोप आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. जमिनीच्या वादातून घडलेल्या या कथित हल्ल्यातील सहभागी व्यक्ती, मारहाणीचे स्वरूप आणि दागिने नेल्याच्या आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार आहे. या प्रकरणातील आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसून, संबंधितांची अधिकृत बाजू समोर येणेही महत्त्वाचे आहे. पुढील तपासाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## नेवासा येथे ट्रकच्या धडकेत गर्भवती महिलेचा मृत्यू !

### सोनोग्राफी करून परतताना काळाचा घाला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : सोनोग्राफी करून वडिलांसोबत दुचाकीवरून घरी परतणाऱ्या आठ महिन्यांच्या गर्भवती महिलेचा ट्रकच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना नेवासा फाटानेवासा मार्गावरील आराध्या मंगल कार्यालयाच्या समोर घडली.नेवासा येथील जुन्या कोर्टा जवळील २२ वर्षीय मिसबा वसीम शेख असे मृत महिलेचे नाव आहे. या दुर्घटनेमुळे नेवासा शहर परिसरात शोककळा पसरली आहे.



पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार शनिवारी (दि. १० ऑक्टोबर) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास मिसबा हया त्यांचे वडील आरिफ देशमुख यांच्या सोबत दुचाकीवरून नेवासा फाट्यावरून नेवासाकडे येत होत्या. त्याच वेळी नेवाशाच्या दिशेने येणाऱ्या मालवाहू ट्रकने (क्रमांक एमएच ०९ बीसी २५४४) दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात मिसबा यांचा जागीच मृत्यू झाला.

मिसबा यांचा वर्षभरापूर्वी विवाह झाला होता. त्या आठ महिन्यांच्या गर्भवती होत्या. या दुर्घटनेत तरुण महिलेचा मृत्यू झाल्याने तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तिच्या पोटातील बाळाचाही दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघाताची नेमकी कारणे आणि परिस्थितीचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार गणेश नागरगोजे हे करत आहे.

## अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी : डॉ. कदम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : भारतामध्ये अलीकडील काळात अन्न प्रक्रिया उद्योगांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे अन्न तंत्रज्ञान विषयातील पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी नोकरी, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. या क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेता अन्न तंत्रज्ञान पदवीधरांचे भविष्य उज्ज्वल असल्याचे प्रतिपादन प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी केले. लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, खडकेवाके येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्वागत समारंभात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर पायरेन्स संस्थेचे संचालक तथा सचिव डॉ. निलेश बनकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अमोल खडके, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. काजल खंडागळे, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभांगी निळे, कृषी तंत्रज्ञान विद्यालयाचे प्राचार्य प्रा. सूरज जोंधळे, विद्यार्थी प्रतिनिधी शाम खरात आणि भावना जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. निलेश बनकर यांनीही विद्यार्थ्यांना अन्न तंत्रज्ञान क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अन्न प्रक्रिया उद्योगातील रोजगार, उद्योजकता आणि भविष्यातील करिअरच्या संधींची माहिती देण्यात आली.

## वनविभागाच्या पथकावर हल्ला प्रकरणातील आठ आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील कोळगाव थडी शिवारात गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून राखीव वनक्षेत्रात साठा केल्याप्रकरणी कारवाईसाठी गेलेल्या वनविभागाच्या पथकावर हल्ला करून शासकीय वाहनाची तोडफोड केल्याच्या आरोपाखाली आठ जणांना अटक करण्यात आली आहे. या आरोपींना कोपरगाव येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी जे. एस. केळकर यांच्या न्यायालयाने १२ ऑक्टोबरपर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील आणखी चार प्रमुख आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दीपक चंद्रभान मोरे (वय ३२), आकाश नंदकिशोर निंबाळकर (वय २९) आणि देवराम वाल्मीक कोळपे (वय ३९, तिघे रा. कोळगाव थडी), प्रतीक मोहन कोळपे (वय २४), जालिंदर भागवत पांढरे (वय ३८) आणि राहुल रविंद्र निकाळे (वय २८, तिघे रा. कोळपेवाडी), तसेच वसीम मोहम्मद शेख (वय ३०) आणि कृष्णा जनार्दन काळे (वय ३५, दोघे रा. कोळगाव थडी) यांचा समावेश आहे. या आठही आरोपींना १० ऑक्टोबरच्या मध्यरात्री अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास कोळगाव थडी परिसरात अवैध वाळू उपसा व साठवणूक होत असल्याबाबत काही नागरिकांनी वनविभागाकडे ऑनलाइन तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार अहिल्यानगर येथील वनविभागाचे फिरते पथक अधिकारी, कर्मचारी आणि साक्षीदारांसह दोन वाहनांतून घटनास्थळी दाखल झाले. गोदावरी नदीपात्रातून राखीव वनक्षेत्रात अवैधरीत्या प्रवेश करून वाळूची साठवणूक व वाहतूक केली जात असल्याच्या संशयावरून पथकाने स्वराज कंपनीच्या मालकीचा ट्रॅक्टर पकडला. या कारवाईचा राग मनात धरून आरोपींसह ३५ ते ४० अनोळखी व्यक्तींनी लोखंडी सळ्या, लाकडी काठ्या आणि लोखंडी कोयते घेऊन वनविभागाच्या पथकाचा रस्ता अडविल्याचा आरोप आहे. त्यानंतर पथक व साक्षीदार बसलेल्या शासकीय वाहनावर हल्ला करून वाहनाची तोडफोड करण्यात आली. तसेच पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा, भारतीय वन अधिनियम आणि महाराष्ट्र गौण खनिज उत्खननासंदर्भातील कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला होता. त्यातून आठ जणांना अटक करण्यात आली.

अटककेलेल्याआरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक अभियोक्ता ॲड. उत्तम पाईक यांनी, तर आरोपींच्या वतीने ॲड. नितीन गंगावणे यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणातील आणखी चार प्रमुख आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदरर्डे पुढील तपास करीत आहेत. वनविभागाच्या पथकावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी केलेल्या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## डॉ. अशोक तुवर यांची प्राचार्यपदी नियुक्ती, विद्यार्थ्यांकडून सत्कार

**नेवासा :** येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.अशोक तुवर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपुलकी आणि कृतज्ञतेच्या भावनेतून सत्कार केला.

महाविद्यालयातील भागवत महेश नानासाहेब प्रथम वर्ष एम.ए. मराठी ,इंगळे ज्ञानेश्वर चंद्रकांत प्रथम वर्ष,कलाआणि पंचमेढे विकास गोरख प्रथम वर्ष विज्ञान या विद्यार्थ्यांनी प्राचार्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. विशेष म्हणजे हे सर्व विद्यार्थी ह.भ.प. उद्धव महाराज यांच्या आश्रमात भक्ती मार्गाचे व मृदुंग वादनाचे ज्ञान श्रवण करण्याचे काम करतात. व आपले शिक्षणही पूर्ण करत आहेत.

याप्रसंगी सत्कारमूर्ती विषयी बोलताना विद्यार्थी म्हणाले, ''प्राचार्य डॉ. तुवर हे केवळ प्रशासक नसून आमचे मार्गदर्शक आहेत. आमच्या प्रत्येक अडीअडचणी ते आपुलकीने समजून घेतात आणि वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करतात. त्यांच्या नियुक्तीने आम्हाला हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे, त्याबद्दल हा कृतज्ञता सोहळा आहे.''

विद्यार्थ्यांच्या या अनोख्या सत्काराने महाविद्यालयात एक जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नवरात्र हा शक्ती भक्ती आणि चैतन्याचा उत्सव : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर:** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यात विविध ठिकाणांहून देवीच्या पायी ज्योती आणण्याची परंपरा भक्तिभावाने जपली जात आहे. घुलेवाडी येथील साई स्वराज्य ग्रुपच्या वतीने दरवर्षी वणी येथील आद्य स्वयंभू शक्तिपीठ श्री सप्तशृंगी निवासिनी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन पायी ज्योत आणली जाते. या पायी ज्योतीचे कारखाना गेट येथे आगमन झाल्यानंतर माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी ज्योतीचे दर्शन घेऊन स्वागत केले. नवरात्र उत्सव हा भक्ती शक्ती आणि चैतन्याचा उत्सव असल्याचे राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी यावेळी म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या गेटवर गुंजाळवाडी व घुलेवाडी येथील युवकांनी आणलेल्या पायी ज्योतीचे पूजन व स्वागत माजी



मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, पायी ज्योत आणण्याच्या या धार्मिक उपक्रमातून युवकांमध्ये श्रद्धा, भक्तिभाव आणि एकतेची भावना निर्माण होते. शारदीय नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि चैतन्याचा उत्सव असून, अशा धार्मिक उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन होते. महाराष्ट्रामध्ये तुळजापूर,कोल्हापूर, माहूर आणि सप्तशृंगी गड हे शक्तिपीठे आहेत. भारतीय परंपरेमध्ये महिलांना मोठे आदराचे स्थान आहे. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने महिला शक्तीचा जागर होतो. संगमनेर तालुक्यामध्ये गावोगावी देवीचे मंदिर आहेत. तालुका हा अध्यात्म आणि पुरोगामी विचार जपणारा तालुका आहे. सर्व लोक एकत्र येऊन सर्व सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

## भोकरमध्ये दोन पिंजऱ्यांना हुलकावणी देत बिबट्याने कालवड केली फस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोकर** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर शिवारात बिबट्याने वनविभागाच्या दोन पिंजऱ्यांना हुलकावणी देत गायीच्या कळपावर हल्ला करून कालवड फस्त केली. भामाठाण रस्त्यालगत शेळके वस्तीवर शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी पहाटे अडीचच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



भोकर शिवारातील सतीश शेळके यांची कालवड बिबट्याने फस्त केल्याचे समवेत पाहणी करताना विलास डगळे, अक्षय बडे, सतीश शेळके, राहुल अभंग, प्रताप पटारे व पत्रकार चंद्रकांत झुरंगे छायाचित्रात दिसत आहे.(छाया - चंद्रकांत झुरंगे)

भाजपचे तालुका संघटक सतीश सूर्यभान शेळके यांच्या गट क्रमांक ५१६ मध्ये सहा गायी बांधलेल्या असताना बिबट्याने कळपावर झडप घातली. जवळच शिवाजी विठ्ठल शेळके यांच्या गट क्रमांक ५५५ मध्ये वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला आहे. मात्र, या पिंजऱ्याला हुलकावणी देत बिबट्याने कालवडीचा फडशा पाडला.

गेल्या दोन महिन्यांपासून भोकर शिवारात बिबट्या व त्याच्या मादीचा वावर वाढला आहे. यापूर्वी बिबट्याने शेळ्या, कालवड व पाळीव कुत्र्यांवर हल्ले केले आहेत. तसेच माणसांवरील हल्ल्यांच्या घटनांत काही जण जखमी झाले आहेत. शेळके कुटुंबाच्या जनावरांवर याच परिसरात एका वर्षात चौथ्यांदा हल्ला झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक विलास डगळे व अक्षय बडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. सध्या सोयाबीन काढणी सुरू असताना शेतकऱ्यांमध्ये भीती पसरली आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी परिसरात आणखी एक पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## भारतरत्न मदर तेरेसा इंग्लिश स्कूलचा डॉजबॉल स्पर्धेत दणदणीत विजय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय डॉजबॉल स्पर्धेत भारतरत्न मदर तेरेसा इंग्लिश स्कूल, गंगापूरच्या १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. या विजयामुळे संघाने आगामी विभागीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे.

या स्पर्धेत भारतरत्न मदर तेरेसा इंग्लिश स्कूलच्या संघाने अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम सामन्यात रायपूर येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी स्कूलच्या संघाचा ९-१ अशा मोठ्या फरकाने पराभव करत गंगापूरच्या संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. खेळाडूंनी दाखवलेली उत्कृष्ट कामगिरी, सांघिक समन्वय, जिद्द आणि खेळातील कौशल्य यांमुळे हा विजय शक्य झाला.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाना आणि मुख्याध्यापिका श्रीमती अनुजा कुलकर्णी , गणेश झोजे , समन्वयक किशोर पठाडे, सुरेखा पाठक ,अफसर शेख यांनी सर्व खेळाडूंचे तसेच क्रीडा शिक्षक राजू वैराळ आणि करुणा साळवे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच आगामी विभागीय स्पर्धेसाठी संघाला शुभेच्छा दिल्या.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# काळे कारखान्याची पहिली उचल प्रतिटन ३,२०० रुपये; विशेष अनुदान

## आ. आशुतोष काळे यांची घोषणा; ७२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामात ऊसाला प्रतिमेट्रिक टन ३,२०० रुपये पहिली उचल देण्यात येणार आहे. तसेच जानेवारीनंतर गाळपासाठी येणाऱ्या ऊसाला प्रतिटन १०० ते २५० रुपये विशेष अनुदान देण्यात येईल, अशी घोषणा कारखान्याचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांनी केली.

कारखान्याच्या ७२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी (दि. ११) घटस्थापनेच्या मुहूर्तावर माजी आमदार अशोकराव काळे व जिल्हा बँकेच्या माजी संचालिका पुष्पाताई काळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून करण्यात आला. यावेळी गव्हाणीत ऊसाची मोळी टाकण्यात आली. आ. काळे म्हणाले की, यंदा कारखाना कार्यक्षेत्रात जुलै महिन्यातच समाधानकारक पाऊस झाला. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पावसाची परिस्थिती वेगळी असून, दुष्काळामुळे शेतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करून उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन आणि ऊस पाचटाचे आच्छादन यांचा वापर वाढवावा. कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यावर शेतकऱ्यांनी भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

ऊस उत्पादकांना अतिरिक्त मदत देण्याबाबत माहिती देताना ते म्हणाले की, १ ते १५ जानेवारीदरम्यान गाळपासाठी येणाऱ्या ऊसाला प्रतिटन १०० रुपये, १६ ते ३१ जानेवारीदरम्यान १५० रुपये, १ ते १५ फेब्रुवारीदरम्यान २०० रुपये, तर त्यानंतर गाळपासाठी येणाऱ्या ऊसाला प्रतिटन २५० रुपये विशेष अनुदान देण्यात येईल. गोदावरी कालव्यांची आवर्तने आणि उपलब्ध पाण्याची स्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी ऊस पिकाचे नियोजन करावे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळत कारखान्याचा हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे, संचालक मंडळाचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, सभासद, शेतकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जनरल मॅनेजर सुनील कोल्हे यांनी केले, तर उपाध्यक्ष दिनार कुदळे यांनी आभार मानले.

# द•ख•ल

## अहिल्यानगरात २४ व २५ ऑक्टोबरला संत साहित्य संमेलन

**नेवासा** : महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग व साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून तसेच आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट संचालित श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात 'संत साहित्य व परंपरा' या विषयावर जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनात विविध पुरस्कारांचे वितरण आणि संत साहित्यविषयक ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. २४ ऑक्टोबर रोजी उद्घाटन सोहळ्यात अगस्ति ऋषी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. के. डी. धुमाळ यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच ह.भ.प. उमेश महाराज बागडे, प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे आणि प्रा. गौतम कराळे यांना संत कार्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी 'श्री ज्ञानेश्वरी चिंतन' या द्विखंडात्मक ग्रंथाचे स्वागत होईल. २५ ऑक्टोबर रोजी सांगता समारंभात सांस्कृतिक कार्य गौरव आणि संत पायिक गौरव पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यासह 'कैवल्याचे चांदणे', 'श्री ज्ञानेश्वर स्वाध्याय विवेक', 'संत ज्ञानेश्वरांचा सामरस्य विचार' यांसह विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. साहित्यप्रेमी आणि आध्यात्मिक क्षेत्रातील भाविकांनी संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## शिंगवे तुकाई फाट्यावर दिशादर्शक फलक, गतिरोधक उभारण्याची मागणी!

**शिंगणापूर** : छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गावरील शिंगवे तुकाई गावाजवळील फाट्यावर दिशादर्शक फलक आणि गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या फाट्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून, परिसरातील एमआयडीसीमध्ये काम करणाऱ्या कामगारांची ये-जा वाढल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित महामार्ग विभागाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. शिंगवे तुकाई गावाकडे जाणारा उपमार्ग थेट छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर महामार्गाला जोडला जातो. या फाट्यावरून गावाकडे जाणारी वाहने तसेच महामार्गावरून वेगाने धावणाऱ्या वाहनांची सतत वर्दळ असते. त्यातच परिसरातील एमआयडीसीमध्ये कामासाठी जाणाऱ्या कामगारांची संख्या वाढत असल्याने या ठिकाणी वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनत आहे.

## कुकाणा येथे दांडिया महोत्सवाचे आयोजन!

**नेवासे** : उमेद - क्षितिज नवा विश्वास या संस्थेच्या वतीने आणि आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या संकल्पनेतून शारदीय नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील लाडक्या बहिणींसाठी भव्य दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे हे दुसरे वर्ष आहे. कुकाणा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहामध्ये हा महोत्सव दि.१२ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ७ वाजता रंगणार आहे.या महोत्सवाच्या आयोजक डॉ.सौ.तेजश्रीताई सिध्दांत नवले-लंघे पाटील असून महिलांसाठी खास कार्यक्रम आयोजित केला आहे. सहा दिवस विविध स्पर्धांची मेजवानी - या दांडिया महोत्सवात केवळ दांडियाच नव्हे तर महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहे सर्व लाडक्या बहिणींनी या भव्य दांडिया महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वळणच्या विद्यार्थ्यांची रेणुका माता दूध संकलन केंद्राला शैक्षणिक क्षेत्रभेट

**राहुरी** : जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, वळण येथील विद्यार्थ्यांनी रेणुका माता दूध संकलन व शीतकरण केंद्राला शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांना दुग्धव्यवसायाची प्रत्यक्ष माहिती मिळाली. पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण घेण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. या क्षेत्रभेटीदरम्यान रेणुका माता दूध डेअरीचे प्रमुख तथा समर्थ ग्रामीण पतसंस्थेचे चेअरमन नवनाथ खुळे, व्हाईस चेअरमन आण्णासाहेब तोडमल आणि प्रदीप भुसे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी दूध संकलन, दुधाची गुणवत्ता तपासणी, शीतकरण प्रक्रिया आणि डेअरीच्या दैनंदिन कामकाजाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून दुग्धव्यवसायाची कार्यपद्धती समजून घेतली. या भेटीचे विशेष आकर्षण म्हणजे डेअरीच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात आलेली मसाला दुधाची मेजवानी, विद्यार्थ्यांनी मसाला दुधाचा मनसोक्त आस्वाद घेतल्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे वनभोजनाचाही आनंद लुटला.

# वैष्णवी चौक प्रतिष्ठानच्या नवरात्रोत्सवाला प्रारंभ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील वैष्णवी चौक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवाला आज भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. लोकनियुक्त नगराध्यक्ष सत्यजित कदम व सौ. प्रीती कदम यांच्या हस्ते देवीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यंदा या नवरात्रोत्सवाचे २१ वे वर्ष असून, प्रतिष्ठानच्या वतीने धार्मिक परंपरा जपण्याची परंपरा कायम ठेवण्यात आली आहे. नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि श्रद्धेचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. या उत्सवानिमित्त देवीची विधिवत पूजा-अर्चा करून प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी धार्मिक विधींमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. देवीच्या आगमनाने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. देवीच्या प्रतिष्ठापना विधीचे पौरोहित्य विजय जोशी व दिनेश जोशी गुरू यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी पार पडले. वैष्णवी चौक प्रतिष्ठानच्या नवरात्रोत्सवाचे हे २१ वे वर्ष असल्याने उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रौत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे.

# ममदापूर सेवा संस्थेची निवडणूक बिनविरोध; १३ संचालकांची निवड

## जवरे-ससाणे गटाला दहा, तर कळमकर-उंडे गटाला तीन जागा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ममदापूर** : राहाता तालुक्यातील ममदापूर विविध कार्यकारी सेवा संस्थेची सन २०२६-२७ ते २०३१-३२ या पंचवार्षिक कालावधीसाठीची संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी दोन्ही गटांत समझोता झाल्याने १३ संचालकांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी संजय पाटील यांनी जाहीर केले. शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे यांनी ही माहिती दिली.

जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळाच्या वतीने माजी सरपंच विजय जवरे, प्रवरा कारखान्याचे माजी उपाध्यक्ष सतीशराव ससाणे व प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे संचालक गोविंद जवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते.

दुसऱ्या गटाकडून पोलीस पाटील ज्ञानदेव कळमकर व अनिल उंडे यांनी उमेदवार उभे केले होते. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता निवडणुकीवरील अनावश्यक खर्च टाळण्यासाठी शिवाजी जवरे व राजेंद्र उंडे यांनी दोन्ही गटांमध्ये समन्वय साधला. त्यानंतर जवरे-ससाणे गटाला दहा, तर कळमकर-उंडे गटाला तीन जागा देण्यावर एकमत झाले.

बिनविरोध निवड झालेल्या संचालकांमध्ये विजय जवरे, आबासाहेब जवरे, आबासाहेब उंडे, बाळकृष्ण पठारे, अनिल रोकडे, निशिकांत ससाणे, रियाजअली पटेल, ज्ञानदेव कळमकर, अमोल आदक, सुनीता गागरे, मीना उंडे, सीताराम बर्डे व सुमन वाकडे यांचा समावेश आहे. या निवडीमुळे संस्थेची निवडणूक शांततेत पार पडली.

# माझा जावई काय करतो हा त्यांचा प्रश्न

## श्रीरामपूरमधील जमीन वाटप प्रकरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यात शेती महामंडळाची तब्बल १२०० एकर जमीन खासगी कंपनीला वाटप करण्यावरून सुरू झालेल्या राजकीय वादावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आपली पहिली थेट प्रतिक्रिया दिली आहे. कल्याणमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी या प्रकरणावर स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. माझा जावई काय करतो हा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे, मी त्याच्यावर कसे बोलणार?, असे सांगत त्यांनी या प्रकरणाशी स्वतःचा राजकीय संबंध जोडणे फेटाळून लावले आहे.



सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी नुकताच आरोप केला होता की, श्रीरामपूरमधील हरेगाव येथील १२०० एकर सुपीक सरकारी जमीन खासदार सुप्रिया सुळे यांचे जावई सारंग लखानी यांच्या कंपनीला देताना महायुती सरकारने दोन आठवड्यांत दोन स्वतंत्र शासन निर्णय (ऋठ) काढून सर्व नियम धाब्यावर बसवले. या वादावर कल्याणमधील मेळाव्यानंतर पत्रकारांनी सुप्रिया सुळे यांना थेट प्रश्न विचारला. त्यावर बोलताना सुप्रिया सुळे यांनी, कोणी काय व्यवसाय करावा हा प्रत्येकाचा व्यक्तिगत अधिकार आहे, त्यामुळे जावयाच्या व्यावसायिक कामकाजावर मी उत्तर देणे योग्य नाही, असे स्पष्ट केले.

याच वेळी पत्रकारांशी आणि पक्ष मेळाव्यात बोलताना सुप्रिया सुळे यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवर आणि निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला. राज्यात एकीकडे भीषण दुष्काळ आणि दुसरीकडे महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यामुळे समाजात प्रचंड अस्वस्थता पसरली आहे, असे त्या म्हणाल्या. इंडिया आघाडीच्या वतीने आम्ही गेल्या वर्षभरापासून निवडणूक आयोगाकडे भेटीची वेळ मागत आहोत, मात्र आयोग वेळ देत नाही. मतदानाच्या टक्केवारीत होणारी संशयास्पद वाढ लोकशाहीसाठी घातक असून, सुप्रीम कोर्टानेही याबाबत गंभीर ताशेरे ओढल्याची आठवण त्यांनी करून दिली.

# दुष्काळग्रस्त गावांत घरपट्टी-पाणीपट्टी माफ करा !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : पावसाची अनिश्चितता, शेतीच्या उत्पन्नावर आलेले संकट आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे ग्रामीण जनतेचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त गावांतील नागरिकांना संपूर्ण घरपट्टी व पाणीपट्टी माफ करून दिलासा द्यावा, अशी मागणी धानोरे, सोनगाव, सात्रळ, पाथरे व हनुमंतगावसह परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून, शेतमजुरांच्या रोजगाराचाही प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांचा चारा, पिण्याचे पाणी आणि कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविताना नागरिकांची दमछाक होत आहे. त्यात ग्रामपंचायतीच्या करांचा अतिरिक्त भार सहन करणे कठीण जात आहे.

ग्रामीण भागातील अनेक गावांत तीन ते चार दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहेत. नियमित पाणी मिळत नसतानाही वर्षभराची पाणीपट्टी भरावी लागत असल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याचा कालावधी आणि उपलब्ध सेवा विचारात घेऊन पाणीपट्टीत सवलत देण्याची मागणीही होत आहे.

शासनाने दुष्काळग्रस्त गावांची परिस्थिती लक्षात घेऊन घरपट्टी-पाणीपट्टी माफीबाबत ठोस निर्णय घ्यावा. तसेच पाणीटंचाई दूर करण्यासाठी टँकर, जलसंधारण आणि रोजगार हमीच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# श्रीरामपूरच्या क्रीडा संकुलासाठी स्टेडियमसह थत्ते ग्राउंडला पसंती

## आ. ओगले, खुरांगेंकडून संयुक्तिक पाहणी ; दै. राष्ट्र सह्याद्रीतील वृत्तानंतर चालना

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : दै. राष्ट्र सह्याद्री मध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर रखडलेल्या आणि राजकीय लालफितीत अडकलेल्या श्रीरामपूर तालुका क्रीडा संकुलाच्या जागेची आमदार हेमंत ओगले जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी संयुक्तिक पाहणी केली. कर्मवीर चौकातील पालिकेचे असलेले स्टेडियम आणि थत्ते ग्राउंड या दोन्ही जागेस या दोघांनी पसंती दर्शवली आहे. श्रीरामपूर शहराच्या हाकेच्या अंतरावर शेती महामंडळाची हजारो हेक्टर शेती उपलब्ध असताना देखील गेल्या २५ वर्षापासून श्रीरामपूर तालुका क्रीडा संकुल आजही पूर्ण होऊ शकले नाही. नियोजनाचा अभाव, निधीची कमतरता आणि जागेची तांत्रिक अडचण यांमुळे श्रीरामपूर क्रीडा संकुल होत नसल्याची कारणे दिली जात आहेत.




पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत श्रीरामपूर शहरातील एका कार्यक्रमात माजी आमदार लहू कानडे यांनी यासंदर्भात मोठा आवाज उठविला होता. जागा दाखवा लगेच मंजूर करतो, असे आश्वासन विखे यांनी भर सभेत दिले होते. श्रीरामपूर तालुका क्रीडा संकुलाचे काम गेल्या अनेक वर्षापासून रखडलेले असून खेळाडूंना हक्काच्या मैदानासाठी आणि आधुनिक सुविधांसाठी अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. राज्य सरकारच्या २००१ च्या क्रीडा धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्याची योजना आखण्यात आली होती. ग्रामीण भागातील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा मिळविण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा संकुले उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.

२००३ मध्ये क्रीडा संकुलातील सोयीसुविधांसाठी २५ लाख रुपयांचा निधी दिला होता. त्यानंतर २००९ मध्ये हा निधी १ कोटी रुपये करण्यात आला. राजकीय कुरघोड्यामुळे या किडा संकुलाचे काम रखडल्याचे सांगितले जात आहे. तालुका क्रीडा संकुला साठी २०० मीटर शर्यतीसाठी धावपट्टी,बॅडमिंटन हॉल,कबड्डी,खो-खो आदी मैदानांसाठी २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असताना देखील हे क्रीडा संकुल आजही स्वप्नच आहे.

# शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत त्रिमूर्तीच्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या मान्यतेने पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी दि.८ ऑक्टोबर व ९ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी यांनी १७ वर्ष (मुले) वयोगटात आशुतोष करणसिंग वळवी याने २०० मीटर धावणे व लांब उडी या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला तर १७ वयोगट (मुली) सोनल जयवंत पाडवी हिने हॅमर थ्रो या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.निर्मला अशोक पाडवी हिने भालाफेक या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक तर वैशाली लालसिंग पाडवी हिने १०० मीटर हर्डल्स या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला.

या उल्लेखनीय यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान च्या अध्यक्षा ड सुमती साहेबरावजी घाडगे पाटील,उपाध्यक्षा ड.स्नेहलताई चेतन चव्हाण पाटील, सहसचिव डॉ. श्रुती गौरव आमले पाटील,कार्यकारी अधिकारी डॉ.गौरव आमले पाटील,विश्वस्त चेतन चव्हाण पाटील, त्रिमूर्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या दिपाली बाविस्कर, क्रीडा समन्वयक व कुस्तीचे राष्ट्रीय पंच, संभाजी निकाळजे,विभाग प्रमुख संतोष राऊत तसेच त्रिमूर्ती पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज तर्फे त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

वरील सर्व यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक राहुल शेळके, अशोक पानकडे, संदीप वाघमारे,समीर पठाण,आमिर शेख,निलेश पैठणे, मेजर परमेश्वर कसाळ,असिफ शेख, खान सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## पान १ वरुन

### ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणी

नाकारली होती. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शिवाजी पार्क परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला होता. परिसरात जाणाऱ्या नागरिकांची तपासणी करण्यात येत होती. आंदोलनासाठी जमलेल्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने तणाव निर्माण झाला. पोलिसांनी सुमारे ३०० आंदोलकांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर सर्वांची सुटका करण्यात आली. दरम्यान, अमित ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांसह शिवाजी पार्क पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन केले. दोन्ही बाजूंच्या नेत्यांनी पोलिसांशी चर्चा केल्यानंतर ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांची सुटका करण्यात आली. आता या प्रकरणात नेमके कोणावर गुन्हे दाखल होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिवसेना भवनाबाहेर तुफान राडा

कार्यकर्त्यांची सुटका होईपर्यंत पोलिसांची गाडी जाऊ देणार नसल्याची भूमिका आदित्य ठाकरे यांनी घेतली. या घडामोडींमुळे शिवसेना भवनाबाहेरील वातावरण अधिकच तापले. पोलिसांची कारवाई आणि शिवसैनिकांच्या भूमिकेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. दरम्यान, शिवसेना भवनाबाहेरील या घडामोडींमुळे मुंबईतील राजकीय वातावरण तापले असून, पोलिसांची पुढील भूमिका आणि ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या सुटकेबाबत लक्ष लागले आहे.

# अशोक कारखाना ही श्रीरामपूर तालुक्याची कामधेनु वाचली पाहिजे

## अशोकलाच ऊस द्यावा : माजी आमदार भानुदास मुरकुटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** साखर कारखानदारी अडचणीत आहे मात्र अशोकच्या कार्यक्षेत्रात बाहेरचे दलाल येवुन वातावरण कलुषीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. गेली ४० वर्षे या भागात ऊसाचे क्षेत्र वाढवण्याचे काम केले त्यामुळे मोठ्या प्रमाणात ऊसाचे क्षेत्र वाढले. अशोक कारखाना परीसराची कामधेनु आहे. त्यामुळे कामधेनु वाचवण्यासाठी अशोकलाच ऊस द्यावा असे अवाहन अशोकचे सर्वेसर्वा माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी येथील सेवा संस्थेच्या प्रांगणात ऊस उत्पादकांच्या आयोजित बैठकित बोलताना केले. अध्यक्षस्थानी जेष्ठ प्रगतशील शेतकरी बाबासाहेब बनकर होते. यावेळी लहानभाऊ नाईक, माजी चेअरमन ज्ञानदेव साळुंके, भारत भवार, शिवाजी शिंदे, राजेंद्र कोकणे, मयुर पटारे, दत्तात्रय नाईक, नानासाहेब लेलकर, गणेश छल्लारे, संचालक निरज मुरकुटे, मधुकर कोकणे, बापुराव त्रिभुवन, दादासाहेब कोकणे, विलास दाभाडे, प्रा.जयकर मगर, गजानन कोकणे, लहानभाऊ पवार, रावसाहेब वाघुले प्रमुख उपस्थित होते.

ऊस गळीत हंगाम सुरु झाला आसल्याने व अशोक बाबत वेगवेगळ्या वावड्या उठत आसल्याने अशोकचे सर्वेसर्वा माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी कार्यक्षेत्रात सभासदांच्या बैठका घेवुन अशोकची बाजु भक्कमपणे मांडत आहेत. यावेळी सभासदांशी संवाद साधताना मुरकुटे म्हणाले कि, गेली ४० वर्षे अशोकच्या कार्यक्षेत्रात पाण्यासाठी सतत संघर्ष केला आहे. १९८७ साली कार्यक्षेत्रात केवळ ३५ हजार टन ऊस गाळपासाठी होता. आमदार आसताना के.टी.बंधारे व कार्यक्षेत्रात अशोक बंधारे तयार करुन पाणी आडवले व जिरवले. त्यामुळे ऊसाचे क्षेत्र वाढले व ७ ते ८ लाख टन ऊस कार्यक्षेत्रात उपलब्ध झाला आहे. आज ज्यांचे अशोकच्या कार्यक्षेत्रात ऊस वाढीसाठी योगदान नाही असे दलाल येवुन सभासदांमध्ये संभ्रम निर्माण करुन वातावरण कलुषीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेली ४० वर्षे अशोकने ऊसाचा रुपया ठेवला नाही. जिल्ह्यातील चांगल्या कारखान्यांच्या बरोबरीने दर दिलेला आहे. शिक्षण संस्था स्वतःच्या मालकीच्या न करता अशोकच्या मालकिच्या केल्या. सभासदांच्या मुलांना त्यातुन दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. राज्यात साखर उद्योगच आडचणीत आहे. त्याचा अशोकच्या कार्यक्षेत्रात बाहेरचे दलाल येवुन अपप्रचार करीत आहेत व सभासदांमध्ये संभ्रम निर्माण करुन ऊसाची पळवापळवी करायला टपले आहेत. अशोक बंद पाडण्याचा या दलालांचा डाव आहे. मात्र अशोक ही तालुक्याची कामधेनु आहे. त्यावर बाजारपेठ आवलंबुन आहे. त्यामुळे ऊस उत्पादक सभासदांनी अशोकलाच ऊस पुरवठा करुन कामधेनु वाचवली पाहीजे. जे साखर कारखाने बंद पडले आहेत तेथील शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अशोक सुरु राहीला पाहीजे. भेंडा व सोनईच्या बरोबरीने अशोकने नेहमीच दर दिलेला आहे. कामधेनु वाचवण्यासाठी कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांनी व सभासदांनी अशोकलाच ऊस द्यावा आसे आवाहनही शेवटी मुरकुटे यांनी केले.

यावेळी कारेगाव भागचे संचालक शिवाजी शिंदे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, भारत भवार, प्राचार्य जयकर मगर यांनी मनोगत व्यक्त करुन काही सुचना मांडाल्या व अशोकलाच ऊस द्यावा असे आवाहन केले. यावेळी सुनिल बोडखे, रामकृष्ण गायकवाड, बापुसाहेब शिंदे, रंगनाथ पवार, रामनाथ पटारे, तुकाराम बोडखे, मच्छींद्र कोकणे, पाराजी पटारे, रेवननाथ कोकणे, बाळासाहेब खुरुद, प्रकाश नाईक, सुभाष पटारे, सुभाष येवले, शिवाजी पटारे, गोवर्धन पटारे, अनिल कोकणे, प्रकाश पटारे, गंगाधर बोडखे, संतोष पटारे, राजेंद्र पटारे आदींसह सभासद व ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### राजकिय विरोधक आसलो तरी ऊस आशोकलाच - कोकणे

गेल्या काही वर्षांपासुन श्रीरामपुरची ओळख संस्था बंद पाडणारा तालुका म्हणुन झाली आहे. तालुक्यातील मुळा - प्रवरा वीज संस्था, पिपल्स बँक, अनेक पतसंस्था, सुतगिरणी, खरेदी विक्रि संघ, अनिष्ठ तफावतीतील अनेक सेवा संस्था बंद पडलेल्या आहेत. बाजारपेठ जिवंत ठेवणारी अशोक कारखाना ही एकमेव संस्था आज जिवंत आहे. त्यामुळे ही कामधेनु जगली पाहीजे. राजकारणात मुरकुटे यांचा राजकिय विरोधक असलो तरी आजपर्यंत ऊस अशोकलाच देत आहे. कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांनीही कामधेनु वाचवण्यासाठी अशोकलाच ऊस द्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे उत्तर अ.नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे यांनी यावेळी केले.

# शारदीय नवरात्र चैतन्यपर्वास घटस्थापनेने प्रारंभ

**राशीन :** हातात धगधगणाऱ्या मशाली..., कुंकवाने भरलेले मळवट.., कडकडणाऱ्या हलग्या, झांजाचा खणखणाट, ढोल-ताशांचा निनाद... अन् उदो बोला उदो... आई साहेबांचा उदो... च्या टिपेला पोहोचलेल्या गजराने आई जगदंबेचे राऊळ व अवघी राशीननगरी पहिल्या माळेलाच दुमदुमून गेली. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या तरुण मंडळांच्या कार्यकर्ते आणि भाविकांनी यमाईदेवीपुढे नतमस्तक होत, ज्योत घेऊन जाण्यासाठी रविवारी पहाटेपासून मोठी गर्दी केली होती. यमाईच्या (जगदंबा) मंदिरात रविवारी (ता.११) सकाळी अकरा वाजता पारंपरिक पद्धतीने विधिवत मंत्रोच्चारात अक्षय महेश शेटे यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. यावेळी पुजारी सुनील रेणुकर ग्रामजोशी संदीप सागडे, शिवदास शेटे, अमोल शेटे ॲड. युवराज राजेभोसले, अनिकेत देवगावकर प्रवीण आंधळकर विश्वंभर जंजिरे जयप्रकाश वाघमारे गणेश रेणुकर श्रीकांत रेणुकर. यांच्यासह गुरव पुजारी व सेवेकरी ग्रामस्थ आदी उपस्थित होते. घटस्थापनेने चैतन्यदायी वातावरणात शारदीय नवरात्र महोत्सवास आरंभ झाला. घरोघरी भाविकांच्या उपवासास घटस्थापना करून सुरुवात झाली. नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांच्या देवघरात कोजागरीपर्यंत नंदादीप तेवत राहणार आहे. पहिल्या माळेला बारामती, इंदापूर, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, बीड, धाराशिव विविध राज्याच्या कानाकोप-यातून भक्तांचे ज्योत मंदिरात वाजत-गाजत आले. त्यामुळे वाहनांची मोठी गर्दी झालो. पहिल्या माळेनिमित्त मुख्य गाभाऱ्यात रंगीबेरंगी पुष्पपालांनी आकर्षक सजावट केली होती. दिवसभर येणाऱ्या भाविकांचा ओघ कायम होता .दरवर्षी नवरात्रोत्सवात मोठ्या श्रद्धेने ज्योत घेऊन जाणाऱ्य ा भाविकांची यंदा पहिल्याच माळेला तुलनेने कमी संख्या दिसून आली. पावसाअभावी महाराष्ट्रावर निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती असल्याची चर्चा भाविकांमध्ये होती. मात्र, उपस्थित भाविकांचा उत्साह, देवीवरील अढळ श्रद्धा आण ि'उदो बोला उदो' चा गजर यामुळ े मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. दुष्काळ हट ू दे; शिवार हिरवेगार होऊ दे !

# नजीक चिंचोलीच्या खडेश्वरी देवी मंदिरात घटस्थापना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील नजीक चिंचोली येथील जगदंबा श्री खडेश्वरी देवी मंदिरात रविवारी (दि. ११) देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. महंत गणेशानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र महोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. घटस्थापनेनिमित्त भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते वेदमंत्रांच्या जयघोषात देवीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या आरतीला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महंत गणेशानंद महाराज यांच्या हस्ते भास्करगिरीजी महाराजांचे संतपूजन करण्यात आले. मंदिर परिसरातील निसर्गरम्य वातावरण आणि भाविकांसाठी केलेल्या सुविधांचे त्यांनी कौतुक करून नवरात्रोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिर परिसरात अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे काकडा भजन, सकाळी पारायण व महाआरती, सायंकाळी महाआरती, कीर्तन आणि रात्री जागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. माहूरची रेणुका देवी आणि तुळजापूरची तुळजाभवानी या दोन शक्तिपीठांचे दर्शन एकाच ठिकाणी घडत असल्याने या मंदिराला विशेष महत्त्व आहे. शनिवारी (दि. १७) सातव्या माळेला जगदंबा खडेश्वरी देवीची यात्रा भरणार आहे. नवरात्रोत्सवातील धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महंत गणेशानंद महाराज, खडेश्वरी देवी भक्त मंडळ आणि ग्रामस्थांनी केले आहे.



# नायगाव जुने शाळेत आजी-आजोबा मेळावा उत्साहात

## उखाणे, संगीत खुर्चीने रंगत; अनिल भारसाकळ अध्यक्ष, अशोक बोर्डे उपाध्यक्ष



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील नायगाव जुने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आजी-आजोबा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कौटुंबिक मूल्यांचे जतन करणे, ज्येष्ठांप्रती आदरभाव वाढविणे आणि आजी-आजोबा व नातवंडांमधील नाते अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि ज्येष्ठांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांविषयी मनोगत व्यक्त केले. आजींसाठी उखाणे स्पर्धा, तर आजोबांसाठी संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. या खेळांमध्ये ज्येष्ठांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. काही आजी-आजोबांनी जुन्या आठवणी आणि नातवंडांसोबतच्या अनुभवांना उजाळा दिला. उपस्थितांचा गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

आजी-आजोबा हे कुटुंबाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या अनुभवातून आणि संस्कारांतून नव्या पिढीला शिकता यावे, यासाठी मेळाव्याचे आयोजन केले, असे शिक्षिका रेहाना मुजावर शेख यांनी सांगितले. या वेळी आजी-आजोबा संघाच्या अध्यक्षपदी अनिल भारसाकळ, तर उपाध्यक्षपदी अशोक बोर्डे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमासाठी अनेक आजी-आजोबा उपस्थित होते. मुदगुल लहारे यांनी विद्यार्थ्यांना बिस्किटांचे पुडे दिले, तर काही आजी-आजोबांनी नातवंडांच्या खाऊसाठी रोख बक्षिसे दिली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण दातीर, उपाध्यक्ष अश्विनी लांडे, पालक सदस्य आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रेहाना मुजावर शेख यांनी केले, तर मुख्याध्यापक शाकीर शेख यांनी आभार मानले.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ तसेच शिक्षण विभागातील केंद्र समन्वयक वाघुजी पटारे, केंद्रप्रमुख शीतल गायकवाड आणि गटशिक्षणाधिकारी दीपक त्रिभुवन यांनी कौतुक केले.

# प्रमोद महाजन व सुरेखा पानकडे यांचा मलेशिया मध्ये सन्मान




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** मलेशिया मधील क्वालालंपूर येथे दि. ६ ऑक्टोबर मंगळवार रोजी ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स तर्फे जगभरातील उत्कृष्ट विमा सल्लागार यांच्या सत्कारासाठी एम.डी.आर.टी कौन्सिल चे आयोजन करण्यात आले होते यावेळी भारतातील ३०० सल्लागारांचा सत्कार करण्यात आला त्यात गंगापूर तालुक्यातील सिद्धनाथ वाडगाव येथील विमा सल्लागार प्रमोद राजुसिंग महाजन व गंगापूर येथील सुरेखा दत्ता पानकडे यांचा उत्कृष्ट विमा सल्लागार म्हणून सत्कार करण्यात आला सोबतच संभाजीनगर येथील जयश्री सराफ व उत्कृष्ट व्यवस्थापक म्हणून अक्षय जंगले यांचा देखील सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला दरवर्षी विमा क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या विमा सल्लागारांचा व त्यांनी केलेल्या कामाचा हा गौरव सोहळा असतो आणि तो यावर्षी क्वालालंपूर येथे पार पडला या पुरस्कार सोहळ्या दरम्यान गंगापूर चे नगरसेवक डॉ आबासाहेब सिरसाठ व दत्ता पानकडे यांची उपस्थिती होती ग्रामीण भागात देखील विमा क्षेत्रात उत्कृष्ट काम करून जागतिक स्तरावरील पुरस्कार मिळवल्याने प्रमोद महाजन व सुरेखा पानकडे यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे त्यांच्या या पुरस्कारासाठी ॲक्सिस मॅक्स चे विभागीय समन्वयक अमोल कोळेश्वर संभाजीनगर कार्यलयाचे व्यवस्थापक संतोष राजहंस, व्यवस्थापक अजीज पठाण, प्रदीप गायकवाड,योगेश धोत्रे. उद्धवराजे काळे,प्रतीक काकडे,श्रीकांत कुमावत,रवींद्र गायकवाड,शरद शिंदे,गोकुळ निंबाळकर,राहुल निंबाळकर निंबाळकर,योगेश देवबोणे, आदींनी हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

# नेप्तीत तुळजापूरहून आणलेल्या पायी ज्योतीचे जल्लोषात स्वागत

**अहिल्यानगर,:** नगर तालुक्यातील नेप्ती येथे शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात भक्तिमय वातावरणात झाली. श्रीक्षेत्र तुळजापूर येथून पायी आणलेल्या पवित्र ज्योतीचे नेप्ती बायपास चौकात ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर वाद्यांच्या गजरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीनंतर देवी मंदिरात विधिवत घटस्थापना करण्यात आली. जय भवानी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या सोहळ्याचे यंदा चौथे वर्ष होते. दि. ८ ऑक्टोबर रोजी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते श्रीक्षेत्र तुळजापूर येथे गेले होते. भवानी मातेचे दर्शन घेतल्यानंतर मंदिरातील अखंड ज्योतीपासून पवित्र ज्योत प्रज्वलित करण्यात आली. ही ज्योत अखंड तेवत ठेवत दोन दिवसांच्या प्रवासानंतर कार्यकर्त्यांनी नेप्तीत आणली. गावातील एकोपा वाढावा, तरुणांमध्ये धार्मिक व सांस्कृतिक परंपरांविषयी आस्था निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे रामदास फुले यांनी सांगितले.

नेप्ती बायपास चौकात ज्योतीचे आगमन होताच ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. महिलांनी पंचारतीने ज्योतीचे औक्षण करून हळदी-कुंकू लावून पूजन केले. पुष्पहार अर्पण करत आणि फटाक्यांची आतषबाजी करून ज्योतीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर बायपास चौकापासून देवी मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. महिलांनी घरांसमोर सडा टाकून आकर्षक रांगोळ्या काढल्याने गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले. मिरवणुकीची सांगता देवी मंदिराच्या पटांगणात झाली. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. पुरोहित राजू कुलकर्णी यांच्या हस्ते अभिषेक झाल्यानंतर वेदमंत्रांच्या जयघोषात पवित्र ज्योतीच्या साक्षीने घटस्थापना करण्यात आली. या उपक्रमात शेखर कांडेकर, गणेश जपकर, दादाभाऊ जपकर, अभिजीत जपकर, योगेश होळकर, समाधान जपकर, विकास जपकर, नितीन येवले, गणेश कांडेकर, सनी त्रिंबके, कुमार होळकर, आदित्य जपकर, प्रवीण चौगुले, भाऊ दळवी, अरुण पाचारणे, रोहित गव्हाणे आणि प्रतीक त्रिंबके यांच्यासह ग्रामस्थांनी सहभाग घेतला. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत मंदिरात सकाळी व सायंकाळी महाआरती, भजन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# बॅडमिंटनमध्ये सोमैया विद्यामंदिरच्या मुलींचा झंझावात !

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर येथील वाडिया पार्क येथे ६ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत सोमैया विद्यामंदिर व उच्च माध्यमिक विद्यालय, साकरवाडीच्या मुलींनी दमदार कामगिरी केली. १९ वर्षे वयोगटात जिल्हा विजेतेपद, तर १४ व १७ वर्षे वयोगटांत उपविजेतेपद पटकावत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर यांच्या अंतर्गत आयोजित या स्पर्धेत विद्यालयाच्या मुलींनी तिन्ही वयोगटांत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.१४ वर्षे वयोगटातील संघात अमृता शिंदे, दीक्षा हुसळे, शाश्वती पवार, अनुष्का गायकवाड आणि आरुषी माने यांचा समावेश होता. या संघाने उपविजेतेपद मिळविले. या गटातून दीक्षा हुसळे हिची पुणे विभागीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.१७ वर्षे वयोगटात तन्वी शिरसाठ, श्रेया थोरमिसे, प्रणाली टेके आणि प्रज्ञा मांदळे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकावले. या गटातून तन्वी शिरसाठ हिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.१९ वर्षे वयोगटात जान्हवी भदाणे, मनीषा प्रसाद, पल्लवी पगारे आणि स्वरा गोर्डे यांनी दमदार खेळ करत जिल्हा विजेतेपदावर नाव कोरले. या चारही खेळाडूंची पुणे विभागीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली असून, त्या अहिल्यानगर ग्रामीणचे प्रतिनिधित्व करणार आहेत.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीरभाई सोमैया, स्थानिक शाळा समितीचे सचिव सुहास गोडगे, प्राचार्य डॉ. सौ. सुनीता पारे, स्पोर्ट्स अकादमीचे प्रमुख श्री. एझाझ, श्री. आदित्य, समन्वयक श्री. रोहन शिंदे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी पुणे विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामागे विद्यालयाचे क्रीडाशिक्षक अनिल तेलगड यांच्यासह पूजा बागुल, वक्ते आणि शुभांगी राऊत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. जिल्हास्तरावर मिळविलेल्या या यशानंतर आता पुणे विभागीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी खेळाडू सज्ज झाल्या आहेत.




## निधनवार्ता

### हरिश्चंद्र शिंदे



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील घुमनदेव येथील प्रगतशील शेतकरी हरिश्चंद्र गोपीनाथ शिंदे (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन भाऊ,पत्नी,दोन मुली,एक मुलगा,सुन असा परिवार असुन घुमनदेव येथील सामाजिक कार्यकर्ते गंगा शिंदे यांचे यांचे वडील होत.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि. १२ ऑक्टोबर २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १२०<br>४९०<br>६७० | ५ | २३०<br>२५८<br>१२२ | ० | १९०<br>२८०<br>२४४ |

१३-३९-४५-५७-९०-०८

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४६<br>४७०<br>३४४ | ७ | १२४<br>४६७<br>१३३ | ८ | १७०<br>१८९<br>११६ |

०१-१९-२७-७४-५८-८६

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | २४०<br>२६८<br>६०० | ४ | १३०<br>१४९<br>११२ | ७ | १२४<br>१७९<br>११५ |

५४-६९-०४-४१-३७-७८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |


# दुर्गाभवानी ज्योतींचे स्वागत करत नेवासा शहरात भक्तिमय वातावरणात घटस्थापना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथे विविध मंडळाच्या वतीने देवींच्या आदी स्थानावरून आणण्यात आलेल्या दुर्गा भवानी ज्योतींचे नेवासा नगरीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.यावेळी शहरातील देवींच्या मंदिरात जाऊन ज्योतीने ज्योत प्रज्वलित करण्यात आली. नेवासा शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात घटस्थापना करण्यात आली.

नेवासा शहरात विविध तरुण मंडळाच्या वतीने आणलेल्या ज्योतीचे नेवासकरांनी चौकाचौकात उत्स्फूर्त स्वागत केले. ढोलताशांच्या गजरात आई जगदंबेच्या नावाने जयघोष करत शेकडो देविभक्तांनी विविध ठिकाणाहून आणलेल्या ज्योती दुर्गादेवी मंदिरात दर्शनासाठी आणल्या.

दुर्गाभवानी ज्योतीचे नेवासा शहरातील दुर्गादेवी मंदिरात आगमन झाल्यानंतर फटाक्यांच्या आतषबाजीने तसेच या ज्योतींच्या प्रमुखांचे दुर्गादेवी तरुण मंडळ व दुर्गादेवी मंदिराच्या वतीने भगवे उपरणे व श्रीफळ देऊन मंदिर पुजारी पत्रकार सुधीर चव्हाण,आप्पासाहेब पठाडे, विलास शिंदे,विठ्ठल चव्हाण, दीपक परदेशी,नितीन कदम,नगरसेवक जालिंदर गवळी,मनोज लालबीगे यांच्या हस्ते पूजन करून स्वागत करण्यात आले.

नवरात्रोत्सवानिमित्त नेवासा शहर व परिसरातील वातावरण दुर्गामय बनले होते नेवासा शहरात नवरात्र उत्सवामुळे घटाचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठ फुलली होती.महिलांसह नागरिकांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसून येत होता नेवासा शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात घटस्थापना करण्यात आली.यावेळी ठीक ठिकाणी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदशास्त्र संपन्न पांडूगुरू जोशी,निखिल गुरू जोशी या युवा पुरोहितांनी केले




फोटो ओळी-नेवासा शहरात घटस्थापना प्रसंगी दूरवरून आलेल्या पायी भवानी ज्योतीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.दुर्गादेवी मंदिरातील दुर्गादेवी मातेची मूर्ती समवेत ज्योत घेऊन आलेले देवी भक्त दिसत आहे(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

द·ख·ल



## जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या मंदिरात घटस्थापना

**निघोज :** राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या मंदिरात सकाळी १० च्या शुभमुहूर्तावर घटस्थापना करण्यात आली. यावेळी पोपट महाराज देशपांडे यांनी पौरोहित्य केले. देवीचे पुजारी गायखे कुटुंब यांच्या कित्येक पिढ्या देवीचे पुजारी म्हणून काम पाहात आहेत. गायखे कुटुंबातील ग्रामपंचायत सदस्या रुपाली ठकाराम गायखे, मळगंगा बचत गटाच्या अध्यक्षा सविता हरिभाऊ गायखे, सुवर्णा सुनिल गायखे, संध्या संतोष गायखे यांनी यावेळी घटस्थापना करीत देवीचे दर्शन घेतले. लवकरच या राज्याला दुष्काळमुक्त करीत राज्यात सुख समाधान शांती समृद्धी नांदो अशी देवीचरणी त्यांनी प्रार्थना केली. राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या दर्शनासाठी नवरात्र उत्सव तसेच चैत्र महिन्यात होणाऱ्या यात्रेसाठी मोठी गर्दी होत असते. नवसाला पावणारी देवी म्हणून माता मळगंगा मातेचा राज्यात नावलौकिक आहे. रविवार दि.११ रोजी पहाटे तीन वाजता देवीचे पुजारी सुनिल हरिभाऊ गायखे यांनी देवीची पुजा केली व अभिषेक केला त्यानंतर येथील गोंधळी दुणगुले कुटुंबातील सदस्यांनी महाआरती केली. शुक्रवार दि.१६ रोजी पियाताई सातपुते प्रस्तुत स्वामी मल्हार व भक्ती संगीत, शनिवार दि.१७ रोजी सचिन कवठेकर यांचा खेळ पैठणीचा हा कार्यक्रम होणार आहे. रविवार दि.१८ भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धा अशाप्रकारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## आबासाहेबांनी निर्माण केलेला शिक्षण व समाजसेवेचा आदर्श प्रेरणादायी : गमे



**शेवगाव :** थोर समाजसेवकांच्या कार्यामुळे समाजमनावर आजही त्यांची नावे स्मरणात आहेत.कर्मयोगी आबासाहेबांनी निर्माण केलेला शिक्षण व समाजसेवेचा आदर्श आजही प्रत्येक पिढीला प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन माजी उपमुख्याध्यापक विठ्ठलराव गमे यांनी केले.चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या ४८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त ते अध्यक्ष स्थानाहून बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्रा. संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, माजी प्राध्यापक सखाराम घावटेप्रा. दादासाहेब ज्योतीक,अशोक आघवणे वत्सला जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. विठ्ठलराव गमे पुढे म्हणाले की, आबासाहेब काकडे म्हणजे अस्मानी आणि सुलतानी संकटांना सामोरे जाणारे गुणवान नेतृत्व होते. शेती, शिक्षण आणि पाणी यासाठी त्यांनी त्यांचे जीवन पूर्ण वाहिले होते. त्यांच्या कार्यांचा वारसा आजही त्यांचे चिरंजीव डॉक्टर विद्याधर काकडे व स्नुषा हर्षदाताई काकडे मोठ्या जोमाने पुढे नेत आहेत. शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा.दादासाहेब ज्योतीक आपल्या मनोगतात म्हणाले की, कर्मयोगी आबासाहेब काकडे यांनी विद्येचे महत्त्व जाणून ग्रामीण भागात शिक्षणाचे मोठे जाळे उभं केले. त्याचबरोबर वसतीगृहे चालू केली. उपेक्षित, कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या लढ्यांमधून त्यांना न्याय मिळवून दिला.कर्मयोगी आबासाहेबांमुळे पुढील व मागच्या पिढीचा उद्धार झाला आहे. त्यांच्या कार्याचा एक तरी गुण प्रत्येकाने आत्मसात करावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वत्सला जाधव, अनुमोदन देवेंद्र लांडे, सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले. तर आभार अक्षय पुरनाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## समाजाशी बांधिलकी असणारे शिक्षक खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीचे शिल्पकार



**शेवगाव :** शिस्तप्रियता व क्षमतांचा योग्य उपयोग करून सर्वांगिण गुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याची कामगिरी करणारे आणि समाजाशी बांधिलकी असणारे शिक्षक खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीचे शिल्पकार आहेत. असे प्रतिपादन जालना येथील डाएटच्या अधिव्याख्याता वैशाली जागीरदार यांनी केले. अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे डॉ. पुरूषोत्तम बिहाणी होते. या वेळी सहप्रांतपाल माधवराव देशमुख व भागनाथ काटे, सचिव डॉ. गजानन लोंढे, अहिल्यानगर रोटरी क्लबचे अध्यक्ष राहूल क्षिरसागर आदी उपस्थित होते. जागीरदार म्हणाल्या की, विद्यार्थी घडविणारा शिक्षकी पेशा हा पवित्र व्यवसाय आहे. विद्यार्थी दैवत मानून त्यांना घडवताना समाजाशी व गावाशी नाळ जोडणारे शिक्षक ख-या अर्थाने राष्ट्र निर्मितीचे काम करतात. शेवगाव रोटरी क्लबने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करतानाच शिक्षकांना नेशन बिल्डर ॲवार्ड पुरस्काराने प्रोत्साहन देण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे. सहप्रांतपाल देशमुख यांनी शेवगाव रोटरी क्लबच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. यावेळी डॉ. संतोषकुमार राठोड, देविदास गरकळ, संजय शिंदे , मलेका अजिममोद्दिन, प्रविण नेहूल, आदींचा नेशन बिल्डर पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. गाडेकर व शिक्षक नेहूल यांनी पुरस्कारार्थींच्या वतीने मनोगत व्यक्त केले. यावेळी युसूफखान पठाण, डॉ. संजय लड्डा, मोहमंद वसीम, कैलास कचरे, संतोष ढाकणे, डॉ. आशिष लाहोटी, मनेष बाहेती, रघुनाथ लबडे, विष्णू गायकवाड आदींसह शिक्षक - शिक्षिका उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा. काकासाहेब लांडे यांनी केले. निलेश मोरे यांनी सूत्रसंचालन केले. आभार सचिव प्रा. गजानन लोंढे यांनी मानले.

## तुळजापूरहून पायी ज्योत व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र शिराळ येथे सालाबादप्रमाणे यावर्षीही शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यासाठी संपूर्ण शिराळ ग्रामस्थ सज्ज झाले आहेत. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली असून, मनमोहक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून गावातील सुमारे १०० तरुण तुळजापूर येथून पायी ज्योत घेऊन रविवारी दुपारी शिराळ येथे पोहोचणार आहेत. या धार्मिक उपक्रमासोबतच गावात ११ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'शारदीय नवरात्र कीर्तन महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांच्या प्रेरणेने, ह.भ.प. वासुदेव महाराज मचे व ह.भ.प. तुबाजी महाराज झाडे यांच्या आशीर्वादाने तसेच ह.भ.प. भगवान महाराज मचे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

# सोलर बसवले; आता शेतकऱ्याला वाली कोण?

### शासनाचा आग्रह, पण विक्रीनंतरच्या सेवेत कंपन्यांची उदासीनता; शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शासनाच्या आग्रहामुळे शेतकऱ्यांनी सौरऊर्जा यंत्रणा बसविण्यासाठी पुढाकार घेतला; मात्र सोलर यंत्रणेत बिघाड झाल्यानंतर दुरुस्ती करून देणार कोण, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. सोलर बसविताना तत्परता दाखविणाऱ्या काही कंपन्या आणि त्यांचे प्रतिनिधी समस्या निर्माण झाल्यानंतर मात्र फोन उचलण्यासही टाळाटाळ करीत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत आहेत. दुरुस्ती करणारे तंत्रज्ञही प्रत्यक्ष काम करण्याऐवजी फोनवरच आश्वासनांची उधळण करीत असल्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे.सोलर बसविण्याचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल, तर कंपन्यांची जबाबदारी निश्चित करून तक्रारींचे वेळेत निराकरण होईल, अशी प्रभावी व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींकडे संबंधित विभाग आता तरी गांभीर्याने लक्ष देणार का, हा प्रश्न अनुत्तरित आहे.




**सोलर बसविताना तत्परता, बिघाड झाल्यावर हात वर!**

सौरऊर्जा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना विविध प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. यंत्रणा बसविताना संबंधित कंपन्यांकडून सेवा आणि मदतीची आश्वासने दिली जातात. मात्र, प्रत्यक्षात बिघाड झाल्यानंतर संबंधितांना संपर्क साधणेही कठीण होत असल्याच्या तक्रारी आहेत. पंप बंद पडला, तांत्रिक दोष निर्माण झाला किंवा यंत्रणेची दुरुस्ती आवश्यक झाली, तर शेतकऱ्यांनी नेमके कोणाकडे धाव घ्यायची? कंपनीचे प्रतिनिधी प्रतिसाद देत नसतील, तर पर्यायी सेवा कुठे उपलब्ध आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा मनस्ताप वाढत आहे.

**तक्रार क्रमांक आहे; मग निवारण कधी?**

संबंधित ग्राहक तक्रार क्रमांकावर तक्रारी नोंदवूनही त्यांचे निराकरण नेमके कधी होणार, याची निश्चित माहिती मिळत नसल्याची तक्रार शेतकरी करीत आहेत. तक्रार नोंदविणे ही प्रक्रिया झाली; पण प्रत्यक्ष दुरुस्ती होऊन यंत्रणा पुन्हा सुरू होणार कधी, हा खरा प्रश्न आहे. शासनाने सौरऊर्जेला प्रोत्साहन देताना यंत्रणा बसविणाऱ्या कंपन्यांच्या विक्रीनंतरच्या सेवेवरही नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**सोलर विक्रीपुरतेच कंपन्यांचे कर्तव्य आहे का?**

शेतकऱ्यांनी पैसे खर्च करून सोलर यंत्रणा बसविल्यानंतर तिची देखभाल व दुरुस्ती वेळेत होणे हीदेखील महत्त्वाची बाब आहे. संबंधित कंपन्यांची सेवा व्यवस्था, हमी कालावधीतील जबाबदारी, तक्रार निवारणाची मुदत आणि दोषी कंपन्यांवरील कारवाई याबाबत स्पष्टता असणे गरजेचे आहे. शासनाने सोलर बसविण्याचा आग्रह धरला असेल, तर त्यातून निर्माण होणाऱ्या तांत्रिक समस्यांमध्ये शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडता कामा नये. अन्यथा, सौरऊर्जेचा लाभ घेण्याच्या अपेक्षेने यंत्रणा बसविणाऱ्या शेतकऱ्यांना दुरुस्तीसाठी हेलपाटे मारण्याची वेळ येईल.

## सण-उत्सव आनंदाने व पारंपरिक पद्धतीने साजरे करा : पो. नि. बालाजी वैद्य

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात धार्मिक उत्साहात आणि मंगलमय वातावरणात घटस्थापना व महाअभिषेक सोहळा संपन्न झाला. तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य व त्यांच्या पत्नी स्वाती वैद्य यांच्या हस्ते विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. यावेळी श्री तुळजाभवानी मातेच्या जयघोषाने तसेच 'आंबे आंबे, उदो उदो'च्या घोषणांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. मंदिरात विविध फुले व कमळांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती.



यावेळी मंदिराचे संस्थापक अशोक कानडे, सुनीता कानडे, अध्यक्ष ओमप्रकाश तिवारी, सचिव नवनाथ आंधळे, स्मिता शितोळे, दत्तात्रेय तांबे, सागर पुंड, गणेश बाबर, सोनिया मुळे यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य म्हणाले की, आपले सण-उत्सव आनंदाने, उत्साहाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरे करावेत. आपल्या सण-उत्सवांमधून भारतीय संस्कृती आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आपल्या हस्ते घटस्थापना झाली, याचा आनंद आहे.

हा नवरात्रोत्सव शांततेत, भक्तिभावाने आणि धार्मिक परंपरेनुसार साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

मंदिराचे संस्थापक अशोक कानडे म्हणाले की, पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात गेल्या अनेक वर्षांपासून शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाही विविध भजनी मंडळांचे भजन, श्री दुर्गा सप्तशती पाठ, देवीची पालखी मिरवणूक, नृत्यदर्पण संस्थेच्या अपर्णा थत्ते यांचा भरतनाट्यम् कार्यक्रम, भव्य सामुदायिक कुंकुमार्चन सोहळा, सुवासिनी पूजन, नवचंडी महायज्ञ, अष्टमी होम आणि कुमारिका पूजन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## पारनेर शहराची उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल : झावरे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहून पारनेरचा विकास आराखडा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मंजूर करून घेतल्यानंतर तातडीने निधी आणला आहे. केवळ निधी मंजूर करून न थांबता प्रत्यक्षात विकासकामांना सुरुवात झाली असून या कामांची पाहणी करताना पारनेरच्या उज्ज्वल भवितव्यासाठी भविष्यातही असाच भरीव निधी आणू, असा विश्वास सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केला.

पारनेर शहराच्या विकासात मोलाची भर घालणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण कामांचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. यामध्ये शहरांतर्गत दशक्रिया विधी परिसराचे काँक्रीटीकरण, ७५ लाख रुपये खर्चाचे पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) आणि १ कोटी रुपयांचे दशक्रिया विधीकडे जाणाऱ्या रस्तासाठी ५०.०० लक्ष तसेच दशक्रिया विधी वाहन पार्किंगसाठी ५०.०० लक्ष या प्रमुख कामांचा समावेश आहे. सुजित झावरे पाटील यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन या सुरु असलेल्या सर्व विकासकामांची पाहणी केली आणि कामाचा दर्जा व गतीबाबत समाधान व्यक्त केले.

**प्रति काशी आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी विशेष संकल्प!**

भविष्यात पारनेर शहर पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न मार्गी लावण्यासोबतच शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी मुख्य चौकांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. 'प्रति काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारनेरमधील बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक महत्त्व आणि पाराशर ऋषींच्या पवित्र स्मृती जपण्यासाठी त्यांच्या नावाने विशेष चौक विकसित करून त्यांचे भव्य सुशोभीकरण केले जाईल, असे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

## निघोज येथे बैलपोळ्याची मिरवणूक उस्ताहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** येथे बैलपोळा उस्ताहात साजरा झाला. यावेळी माईल सिंगर पार्टी टाकळी ढोकेश्वर यांच्या बँजो पार्टीने या मिरवणुकीत मोठा उत्साह आणला. देवीच्या बैलपोळ्याची मिरवणूक वेशीपासून दुपारी ४ वाजता निघाली. यावेळी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील जनतेने बैलपोळा मिरवणूक पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. मळगंगा देवीचा जयजयकार करीत तसेच भंडाऱ्यांची मुक्त उधळण करीत फटाक्यांची आतषबाजी करीत मिरवणुकीला शोभा आली होती. वेस ते मागील पेठ तसेच मळगंगा मंदीराजवळ मिरवणूक आल्यानंतर बैलपोळ्याचे देवीचे पुजारी सुनिल गायखे व महिला भगीनी यांनी पुजन केले. पोळीचा नैवेद्य यावेळी बैलपोळ्याला दाखवून औंशन केले. त्यानंतर ही मिरवणूक पुन्हा जुनी पेठ मार्गाने ग्रामपंचायत चौक, संदीप पाटील चौक ते वेशीपर्यंत आणल्यानंतर या मिरवणुकीची सांगता करण्यात आली. देवीच्या बैलाला या मिरवणुकीत मान दिला जात असून या बैलपोळ्याची मिरवणूक



पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो लोक गर्दी करीत असतात. मळगंगा देवी यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, पदाधिकारी व उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे व यात्रा समीती पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी चार दिवसांपूर्वी बैलपोळा साजरा करण्यासाठी बैठक घेतली होती. सध्या शेतकऱ्यांना ट्रॅक्टर साधने शेतीसाठी उपयुक्त असल्याने बैलांची संख्या कमी झाली आहे. म्हणून बैलपोळ्याची मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्याचा निर्णय यात्रा समीती व ग्रामस्थ यांनी घेतला होता. पुर्वीच्या धार्मिक रुढी परंपरा जतन करून त्या मोठ्या उत्साहात सण साजरे करण्याचा निर्णय यात्रा समीतीने घेतल्याने ही बैलपोळ्याची मिरवणूक लक्षवेधी ठरली असल्याची प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

## ढोरजळगावला कापूस खरेदी केंद्र सुरू



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव :** यावर्षी अलनिनोमुळे पावसामध्ये मोठ्या प्रमाणात घट झालेली असुन त्यामुळे दुष्काळही जाहीर करण्यात आला असुन आशा परिस्थितीत ज्या शेतकऱ्यांकडे कपाशी पिकांना पाणी देणे शक्य होते अशा शेतक-यांनी कापसाचे पीक कसेतरी आणले असले तरी उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होणार हे निश्चित आहे.दरवर्षीप्रमाणे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा आणि त्यांची व्यापारी वर्गाकडून होणारी पिळवणूक थांबावी, या उद्देशाने ढोरजळगाव येथे वृध्देश्वर फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या वतीने कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. या कापुस खरेदी केंद्रात पहिल्याच दिवशी कापसाला ९ हजार ५०० रुपये प्रति क्विंटल असा विक्रमी बाजारभाव मिळाल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या कापुस खरेदी केंद्राचा शुभारंभ ढोरजळगाव येथील वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक बापुसाहेब पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी देविदास पाटेकर, देविदास सांगळे,लक्ष्मण डोळस, भुजंग शेळके, वृध्देश्वर फार्मर प्रोडुसर कंपनीचे चेअरमन आनंता ऊकीडे,व्हा चेअरमन महादेव पाटेकर संचालक हसनभाई शेख, बाळासाहेब पाटेकर, सारंगधर पाटेकर,भारत तळेकर,शंकर दळे,राम पवार, तुषार आव्हाड, डॉ प्रदीप पाटेकर, अण्णासाहेब बडे,शिवाजी पाटेकर ,अविनाश काशिद, दिपक काशिद,तारमहमंद शेख,बापू पाटेकर असीन शेख आदीसह परिसरातील शेतकरी आणि कंपनीचे संचालकांसह ग्रामस्थ उपस्थित होते आभार हसनभाई शेख यांनी मानले.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या बैठकीत संघटनात्मक बांधणीवर भर : कदम



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हा संपर्क प्रमुख नयन कदम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत पक्षाची सद्यस्थिती, संघटनात्मक बांधणी, पदाधिकाऱ्यांची जबाबदारी, नागरिकांच्या समस्या आणि आगामी काळातील पक्षाच्या कार्याची दिशा यावर चर्चा करण्यात आली. पक्षाची ताकद वाढविण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने काम करावे, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे आणि पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवावेत, असा सूर या बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीला मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष अवधूत चव्हाण, मुंबई विभाग अध्यक्ष जतिन पवार, जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, डॉ. संतोष साळवे, तुषार हिरवे, दीपक दांगट, संकेत व्यवहारे, संदीप चौधरी, प्रशांत जाधव यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा संपर्क प्रमुख नयन कदम म्हणाले की, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपली जबाबदारी ओळखून काम केले पाहिजे. जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यकर्ते उपलब्ध असतील, तर नागरिकांचा पक्षावरील विश्वास वाढेल. यावेळी डॉ. संतोष साळवे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अवधूत चव्हाण, जतिन पवार, सचिन डफळ व अविनाश पालवे यांच्यासह उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेलाही महत्त्व देण्यात आले.

# पाथर्डीच्या मिरी उपबाजारासाठी १० एकर शासकीय जमीन मंजूर : आ. मोनिका राजळे

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मिरी उपबाजारासाठी मिरी येथील गट क्रमांक ९६५ मधील १० एकर (४ हेक्टर) शासकीय जागा मिळावी यासाठी बाजार समितीने वर्षाभरापूर्वी जिल्हाधिकारी यांचे मार्फत राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत १ रुपया नाममात्र दराने मंजूरी दिली असून त्याबाबतचा ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय निघाला लवकरच मिरी उपबाजारच्या विकास कामाला सुरवात केली जाईल अशी माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.

याबाबत माहिती देतांना आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले की गेल्या साडे तीन वर्षापूर्वी पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीची सत्ता हाती आल्यानंतर संचालक मंडळाने शेतकरी व व्यापारी यांना विश्वासात घेवून बाजार समितीचा कारभार अत्यंत सुनियोजित पद्धतीने सुरु केला आहे. यापूर्वी तोटयात असलेली बाजार समिती गेल्या तीन वर्षात अनेक विकासकामे करून सध्या नफयात आहे.

बाजार समितीच्या माध्यमातून शेतकङ्यांच्या शेती मालाला चांगला दर व व्यापऱ्यांना सुविधा देण्यासाठी संचालक मंडळ नेहीमीच प्रयत्नशील असते. गेल्या महिन्यात तालुक्याच्या पूर्व भागातील भालगाव येथे उपबाजार विकास कामाला सुरवात केली आहे.

तर पश्चिम भागातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मिरी उपबाजार सुरु करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला होता परंतू मिरी येथे बाजार समितीची स्वत:ची जागा नसल्याने मिरी येथील शासकीय गायरान गट नं. ९६५ मधील ४ हेक्टर (१० एकर) जागा उपबाजारासाठी मिळावी या मागणीचा प्रस्ताव बाजार समितीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास पाठविला होता. सदर प्रस्ताव एक वर्षांपासुन शासन स्तरावर प्रलंबीत होता.

बाजार समिती संचालक मंडळाला बरोबर घेऊन मंत्रालय स्तरावर मुख्यमंत्री, महसूलमंत्री, पणनमंत्री, पालकमंत्री तसेच महसूल राज्यमंत्री व प्रत्येक विभागाचे सचिव यांची आ. अक्षय कर्डीले यांच्यासह वारंवार भेट घेऊन सतत पाठपुरावा केला. अखेर या पाठपुराव्याला यश मिळाले असून महसूल व वन विभागाने कृषी उत्पन्न बाजार समिती पाथर्डी यांना उपबाजारासाठी मिरी गट क्रमांक ९६५ येथील ४ हेक्टर ( १० एकर ) जमीन नाममात्र ०१ रुपये दराने कब्जा हक्काने देण्याचा शासन निर्णय पारीत झाला आहे. आता मिरी उपबाजार सुरू करण्यासाठीचे सर्व अडथळे दूर झाले असून तातडीने इतर प्रक्रिया पुर्ण करुन लवकरच शेतकऱ्याच्या सोयीसाठी मिरी येथे उपबाजार सुरु केला जाईल असेही आमदार राजळे यांनी यावेळी सांगितले.



याबाबत बोलतांना सभापती सुभाष बर्डे म्हणाले की तालुक्यातील मिरी उपबाजारासाठी शासकीय जमीन मिळावी यासाठी प्रस्ताव तयार करतांना ग्रामस्थ व ग्रामपंचायत मिरी, ग्राम महसुल अधिकारी कार्यालय मिरी, तहसिल कार्यालय पाथर्डी, उपविभागीय अधिकारी पाथर्डी भाग पाथर्डी, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर व पणन विभाग, महसुल विभाग, वित्त विभाग यांच्यासह सर्वच प्रशासकीय विभागाने मोलाचे सहकार्य केले. मिरी उपबाजार समितीला शासकीय जमीन मिळवून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे पणनमंत्री जयकुमार रावल, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, मा.खा. सुजय विखे पाटील, आ.मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डीले यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या वतीने मनापासून आभार व्यक्त करतो.

# दखल

## घोडेगावच्या वसतिगृहात खुले ग्रंथालय उपक्रम

### पुस्तक परिचयातून विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड जोपासण्याचा प्रयत्न

**घोडेगाव :** सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत घोडेगाव येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहात १० ऑक्टोबर रोजी 'खुले ग्रंथालय व पुस्तक परिचय' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानात भर घालणे आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात विद्यार्थिनींना विविध विषयांवरील पुस्तकांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थिनींनी आवडीची पुस्तके निवडून त्यांचे वाचन केले. तसेच पुस्तकांमधील महत्त्वाचे विचार, माहिती आणि आशय इतर विद्यार्थिनींसमोर मांडले.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना वाचनातून मिळालेले ज्ञान व्यक्त करण्याची संधी मिळाली. ग्रंथालय मंत्र्यांच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी ग्रंथालयातील पुस्तके वाचनासाठी घेतली. यावेळी वसतिगृहाच्या गृहपाल रेणुका जाधव, कर्मचारी आणि विद्यार्थिनी सहभागी झाल्या.वाचनसंस्कृती रुजविणे, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित करणे आणि ज्ञानाधिष्ठित व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

## सासवडच्या शोकसभेत आबा क्षीरसागर यांना श्रद्धांजली




**सासवड येथील शोकसभेत आदरांजली वाहताना विजय कोलते**

**सासवड :** पैशाने नाही पण मनाने प्रचंड श्रीमंत असलेल्या नामदेव शिंपी समाजातील आबासाहेब गोपाळराव क्षीरसागर यांच्याविषयी अनेकांच्या मनात वेगवेगळ्या स्मृती आहेत त्यांचे संकलन करून एक सुंदर पुस्तक काढू. ती त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे विचार आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयराव कोलते यांनी व्यक्त केले आहेत. नामदेव शिंपी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते, शरद सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन

आबासाहेब क्षीरसागर यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी नुकतेच निधन झाले त्यांच्या शोकसभेत कोलते बोलत होते. याच कार्यक्रमात जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. क्षीरसागर यांच्या अनेक स्मृतीना या वेळी अनेकांनी उजाळा दिला सदरच्या सभेत अँड दिलीप निरगुडे, नंदू जगताप बाळासाहेब मुळीक, माऊली जगताप, अँड अण्णासाहेब खाडे, डॉ दिपक जगताप, गोविंद बोत्रे, माऊली मेमाणे शामकांत भिंताडे आदींनी मनोगतातून क्षीरसागर व नाना पाटेकर यांना आदरांजली वाहिली. शांताराम पोमण यांनी सूत्रसंचालन केले. संजय चव्हाण, डॉ राजेश दळवी, केदार क्षीरसागर, रुपाली क्षीरसागर, सर्जराव पोमण, दशरथ कामथे, प्रदिप दुर्गाडे, प्रशांत जगताप, अशोक पवार, हेमंत ताकवले सुनील वढणे, जगदीश शिंदे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते

## खामगावात बैलपोळा उत्साहात; दुष्काळाची चिंता

### पाऊस आणि चारा-पाण्याच्या प्रश्नाने शेतकरी चिंतित

खामगाव : दौंड तालुक्यातील खामगाव येथील गणेशनगर परिसरात शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा सण बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांना सजवून, त्यांची पूजा करत शेतकऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मात्र, पावसाची ओढ आणि दुष्काळाच्या सावटामुळे सणाच्या आनंदावर चिंतेचे सावट दिसून आले.



पोळ्यानिमित्त सकाळपासूनच परिसरात लगबग सुरू होती. शेतकऱ्यांनी बैलांना अंघोळ घालून त्यांच्या अंगावर रंगीबेरंगी झूल, शिंगांना बेगड, गळ्यात घुंगरमाळा आणि डोक्यावर बाशिंगे बांधून सजविले. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा करण्यात आली. पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

**दुष्काळामुळे चिंता वाढली :**

यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप पिके धोक्यात आली आहेत. विहिरी आणि कूपनलिकांतील पाणीसाठा कमी होत असल्याने आगामी काळात जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. आर्थिक अडचणींमुळे सणासाठीच्या खरेदीवरही परिणाम झाल्याचे दिसून आले.

**चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर :**

दरवर्षी पोळा मोठ्या उत्साहात साजरा करतो. मात्र, यंदा पाऊस नसल्याने चिंता वाढली आहे. आज बैलांची पूजा केली; पण पुढे त्यांना चारा-पाणी कुठून आणायचे, हा मोठा प्रश्न आहे, अशी प्रतिक्रिया अनिल नागवडे, हनुमंत नागवडे, संतोष नागवडे, सचिन नागवडे, उत्तम नागवडे आणि इतर शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# पुणे जिल्हा परिषद राज्यात द्वितीय

## आडाचिवाडी ग्रामपंचायतीचा राज्यात प्रथम क्रमांक; जिल्ह्यातील २७६ ग्रामपंचायतींचा सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या पहिल्या वर्षात पुणे जिल्हा परिषदेने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला, तर पुरंदर तालुक्यातील आडाचिवाडी ग्रामपंचायतीने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. जिल्ह्यातील २७६ ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग घेतला. करवसुली, लोकसहभाग, महिला सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती, जलसंधारण आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासासाठी करण्यात आलेल्या कामांची या अभियानांतर्गत दखल घेण्यात आली.

अभियानांतर्गत जिल्ह्यातील ग्राम पंचायतींनी सुमारे २४५ कोटी रुपयांची थकीत करवसुली केली. विविध विकासकामांसाठी ७.९७ कोटी रुपयांची लोकवर्गणी जमा झाली. दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी ४,९९५ विशिष्ट दिव्यांग ओळखपत्रे उपलब्ध करून देण्यात आली. सामाजिक अर्थसाहाय्य योजनांतून १६ हजार ३८९ पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

**महिला सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती :**

जिल्ह्यात ११ हजार ९२ नवीन महिला बचत गट स्थापन करण्यात आले, तर ५,१४७ बचत गटांना खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात आले. अभियानाच्या आकडेवारीनुसार, ६० हजार ८३३ महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक झाले. रोजगार हमी योजनेतून एक लाख ६५ हजार २७४ मनुष्यदिन रोजगारनिर्मिती करण्यात आली.

जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनासाठी ७३४ जलस्रोतांचे बळकटीकरण, ५,२४४ सौर कृषिपंपांची उभारणी आणि सात लाख १२ हजार ५८७ वृक्षांची लागवड करण्यात आली. ग्रामीण भागातील शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधा सुधारण्यासाठी ६५१ शाळा, ८४६ अंगणवाडी केंद्रे आणि १५४ पशुवैद्यकीय दवाखाने सक्षम करण्यात आले. तसेच, ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यासाठी २३० खुल्या व बंदिस्त व्यायामशाळा उभारण्यात आल्या.

**नियोजन आणि समन्वयावर भर :**

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. जिल्हा व तालुका स्तरावर वॉर रूम, तालुका पालक अधिकारी आणि ग्रामपंचायतींमध्ये समन्वय व्यवस्था निर्माण करण्यात आली. डिजिटल प्रणालीद्वारे कामांचा आढावा, विभागांतील समन्वय आणि प्रलंबित कामांचा पाठपुरावा करण्यात आला. 'समृद्ध दिवाळी', 'समृद्ध पाडवा', 'एक दिवस समृद्धीसाठी' आणि 'कॉफी विथ सीईओ' या उपक्रमांतूनही लोकसहभाग वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या अभियानातून ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक सुरक्षा, रोजगारनिर्मिती आणि शाश्वत ग्रामीण विकासाला चालना देण्यावर भर देण्यात आला.

जिल्हा परिषदेला मिळालेला द्वितीय क्रमांक आणि आडाचिवाडी ग्रामपंचायतीने मिळविलेले पहिले स्थान हे जिल्ह्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या, शासकीय विभाग आणि ग्राम स्थांच्या सहभागातून झालेल्या कामांची नोंद आहे.

# 'अलबत्या-गलबत्या'च्या सात प्रयोगांतून रंगणार बालनाट्याचा शिखर विश्वविक्रम

- **पुण्यात १५ ऑक्टोबरला सलग ७ प्रयोग**
- **महापालिका शाळांतील सात हजार विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मराठी बालरंगभूमीवर लोकप्रियतेचा इतिहास घडविणाऱ्या 'अलबत्या-गलबत्या' या बालनाट्याचे एकाच दिवशी, एकाच ठिकाणी सलग सात प्रयोग सादर करून विश्वविक्रम करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. येत्या गुरुवारी (ता. १५) बालगंधर्व रंगमंदिरात हे प्रयोग होणार असून, पुणे महापालिकेच्या शाळांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील सात हजार विद्यार्थ्यांना विनामूल्य नाटक पाहण्याची संधी मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सर्वस्व प्रॉडक्शन आणि अद्वैत थिएटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने, पुणे महापालिकेच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी पत्रकार परिषदेत या उपक्रमाची माहिती दिली. निर्माता राहुल भंडारे आणि अभिनेत्री श्रद्धा हांडे उपस्थित होत्या.मराठी बालरंगभूमीवरील गाजलेले 'अलबत्या-गलबत्या' हे नाटक २३ मे २०१८ रोजी पुन्हा रंगभूमीवर आले. त्यानंतर ३६५ दिवसांत ३३३ प्रयोगांचा टप्पा गाठणाऱ्या या नाटकाचे आजवर ९९३ प्रयोग झाले आहेत. लेखक रत्नाकर मतकरी यांच्या लेखणीतून साकारलेल्या या नाटकाने गेल्या पाच दशकांत बालप्रेक्षकांच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहे. निर्माता राहुल भंडारे आणि दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर यांनी या नाटकाला नव्या स्वरूपात रंगभूमीवर आणले आहे.या विश्वविक्रमासाठी सकाळी सात वाजल्यापासून रात्रीपर्यंत सात प्रयोगांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी सात, सव्वानऊ, साडेअकरा, दुपारी दोन, सव्वाचार, साडेसहा आणि रात्री पावणेनऊ वाजता हे प्रयोग होणार आहेत. सातही प्रयोगांमध्ये कलाकारांचा एकच संच सहभागी होणार आहे. प्रत्येक प्रयोगासाठी नवीन बालप्रेक्षक उपस्थित राहणार आहेत. नाटकात प्रसिद्ध अभिनेते चिन्मय मांडलेकर यांनी साकारलेली चेटकीण प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. ऋद्धेश गोपाळराव, स्नेहभूषण मुणगेकर आणि श्रद्धा हांडे यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. नाटकातील संवाद, गाणी, विनोद आणि कल्पनारम्य प्रसंगांतून मुलांना मनोरंजनाबरोबरच सकारात्मक विचारांचा संदेश दिला जातो.

**एका दिवसात सात प्रयोग, सात हजार बालप्रेक्षक**

- **१५ ऑक्टोबर : बालगंधर्व रंगमंदिर, पुणे**
- **७ प्रयोग : एकाच दिवशी, एकाच ठिकाणी**
- **७,००० विद्यार्थी : महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश**
- **१,१९३ प्रयोग : 'अलबत्या-गलबत्या'चे आजवरचे प्रयोग**
- **एकच कलाकार संच : सातही प्रयोगांत सहभागी**
- **'आनंद सफर'मधून बालकांना नाट्यसंस्कार**

**'सुदृढ बालपण म्हणजे सक्षम महाराष्ट्राची पायाभरणी' या संकल्पनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली एक हजार दिवसांचा उपक्रम राबविण्याचा मानस आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून 'आनंद सफर'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नाट्यकलेचा अनुभव देण्यात येणार आहे. मुलांमधील सर्जनशीलता, संवादकौशल्य आणि आत्मविश्वास वाढविण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे अनास्कर यांनी सांगितले.**

**विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळ**

बालपणात नाटकाच्या माध्यमातून मुलांची कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि संवेदनशीलता विकसित होते. त्यांच्यातील भीती, न्यूनगंड दूर होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. त्यामुळे हा उपक्रम केवळ विश्वविक्रमापुरता मर्यादित नसून, महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार नाट्यकलेचा अनुभव देण्याचा प्रयत्न असल्याचे अनास्कर यांनी सांगितले. या निमित्ताने विद्यार्थ्यांना 'रंजू आणि वैशूचे झाड' या चित्रपुस्तकाचे वाटपही करण्यात येणार आहे.

**बालरंगभूमीच्या इतिहासातील आगळा उपक्रम**

'अलबत्या-गलबत्या' नाटकाच्या लोकप्रियतेत त्यातील गाण्यांचाही मोठा वाटा आहे. रत्नाकर मतकरी, चिन्मय मांडलेकर, समृद्धी पांडे, सोनल गायकवाड आणि संस्कारी यांनी शब्दबद्ध केलेली गाणी बालप्रेक्षकांमध्ये लोकप्रिय झाली आहेत. गेल्या पाच दशकांपासून मुलांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या या नाटकाचा एकाच दिवसातील सात प्रयोगांचा उपक्रम मराठी बालरंगभूमीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# राहू-वाघोली रस्त्यावरील अपघातांमुळे नागरिक संतप्त

### सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव; ठेकेदारावर कारवाईची मागणी, आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहू :** एमएसआयडीसीच्या माध्यमातून राहू-वाघोली सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, संथ गतीने आणि नियोजनाअभावी सुरू असलेल्या या कामामुळे वाहनचालकांना अपघातांचा धोका पत्करून प्रवास करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांत या मार्गावर लहान-मोठे अपघात झाल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. रस्त्याच्या कामादरम्यान सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तक्रारींसाठी संपर्क साधूनही संबंधित ठेकेदार फोन उचलत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



**सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव :** रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून सुरू आहे. मात्र, रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज यावा यासाठी रिफ्लेक्टर, चमकणारे सूचना फलक आणि बॅरिकेड्स लावण्यात आलेले नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी खोदकाम केल्यानंतर रस्ता तसाच ठेवण्यात आला असून, रस्त्याच्या कडेला माती आणि खडीचे ढीग साचले आहेत. त्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांसह अन्य वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**कारवाईची मागणी; आंदोलनाचा इशारा :** रस्त्यावरील अपघातांचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी ठेकेदाराकडे सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. मात्र, ठेकेदाराकडून प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. रस्त्याचे काम सुरू असताना आवश्यक सुरक्षा व्यवस्था करणे गरजेचे असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

'अपघात होऊन निष्पाप नागरिकांचे जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?' असा सवाल उपस्थित करत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित ठेकेदारावर तातडीने कारवाई करावी, तसेच रस्त्यावर सूचना फलक, रिफ्लेक्टर आणि बॅरिकेड्स लावून सुरक्षित प्रवासाची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे. या प्रकरणी एमएसआयडीसी आणि संबंधित प्रशासन काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकारांची लेखणी समाजाला दिशा देणारी : प्रकाश धारीवाल

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**




**शिरूर :** पत्रकार समाजातील चांगल्या गोष्टींना प्रसिद्धी देतात, तर वाईट प्रवृत्तींवर लेखणीच्या माध्यमातून अंकुश ठेवतात. समाजाला दिशा देण्याबरोबरच विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना मोठे करण्याचे कार्य पत्रकार करतात, असे मत उद्योगपती प्रकाश धारीवाल यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शिरूर तालुका शाखेच्या वतीने शुक्रवारी (ता. ९) शिरूर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १४ मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या वेळी धारीवाल बोलत होते.

पत्रकार संघाच्या वतीने गेल्या १५ वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. पत्रकार सामाजिक बांधिलकी जपत गरजू विद्यार्थ्यांना मदत करतात आणि समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेतात, ही बाब महत्त्वाची असल्याचे धारीवाल यांनी सांगितले.

सिनेअभिनेते सुनील गोडबोले म्हणाले, पत्रकार संघाकडून मिळालेला पुरस्कार हा त्यांच्यासाठी पहिलाच असल्याने त्याचा आनंद वेगळा आहे. प्रत्येकाने कष्ट करून स्वतःला सिद्ध करावे आणि आयुष्यात मोठे व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्यात सुनील गोडबोले यांना 'सिनेरत्न', गंगाराम जाधव यांना 'मानवसेवारत्न', प्रकाश धारीवाल मित्र मंडळ आणि 'महावीर की रोटी' यांना 'समाजरत्न', दीपक करगळ व धरमचंद फुलफगर यांना 'उद्योगरत्न', निलेश गायखे यांना 'ज्योतिष व वास्तुविशारद रत्न', प्रिया बिरादार यांना 'समाजरत्न', अशोक मानमोडे यांना 'कोरोना योद्धा', रामदास राऊत यांना 'उत्कृष्ट दिग्दर्शक', बापुसाहेब जाधव, अरुण मोटे व भगवान श्रीमंदिलकर यांना 'आदर्श पत्रकार', तर निलेश पाठक यांना 'सर्पमित्र' पुरस्काराने गौरविण्यात आले.

पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष शिंदे, तालुकाध्यक्ष अर्जुन बढे, शहराध्यक्ष बबन वाघमारे यांच्यासह मान्यवर, पत्रकार व नागरिक उपस्थित होते. स्वागत संतोष शिंदे यांनी केले, प्रास्ताविक अर्जुन बढे यांनी केले, तर आभार बबन वाघमारे यांनी मानले.

# नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



दिवे : दिवे (ता. पुरंदर) येथील ग्रामदैवत श्री कातोबानाथ मंदिरात शेकडो वर्षांची परंपरा जपत नवरात्रोत्सवाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करून करण्यात आली. यानिमित्त मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. मंदिरात पुजारी स्वप्निल दिवेकर, दिगंबर दिवेकर, दीपक दिवेकर, पोलिस पाटील बाळासाहेब झेंडे, रमेश झेंडे, गुलाब झेंडे यांच्यासह ग्रामस्थांच्या उपस्थितीत विधिवत घटस्थापना करण्यात आली. नवरात्रोत्सवाच्या काळात दररोज मंदिरात प्रदक्षिणेसाठी पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. यावर्षी समस्त झेंडे मंडळ बारवके भावकीकडे पालखीचा मान आहे. पालखी सोहळ्यात दिवे गावासह परिसरातील बारावाड्यांमधील विविध भावकीचे ग्रामस्थ आपापले ढोल घेऊन मंदिरात उपस्थित राहतात. ढोलांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात पालखी सोहळा पार पडतो. या सोहळ्यानंतर मंदिरात रात्रभर जागरणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. श्री कातोबानाथ मंदिरातील नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, गावातील अनेक वर्षांची परंपरा, श्रद्धा आणि एकोप्याचे प्रतीक मानला जातो. या उत्सवाच्या माध्यमातून ग्रामस्थ एकत्र येत परंपरेचे जतन करतात. त्यामुळे नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते....

# पूर्व आंबेगावात भाद्रपद बैलपोळा उत्साहात!

## मेंगडेवाडी, निरगुडसर, जारकरवाडी, पोंदेवाडीसह परिसरातील गावांमध्ये पारंपरिक सणाचा उत्साह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, लाखणगाव, देवगाव, लोणी आणि धामणी परिसरात भाद्रपद बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतीकामात वर्षभर शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना सजवून त्यांची पारंपरिक पद्धतीने पूजा केली.

बैलपोळ्यानिमित्त गावोगावी सणाचे वातावरण पाहायला मिळाले. शेतकऱ्यांनी बैलांना स्वच्छ अंघोळ घालून त्यांच्या शिंगांना रंग लावले. अंगावर आकर्षक झूल, गळ्यात घुंगरांच्या माळा, रंगीबेरंगी दोर आणि विविध अलंकार घालून बैलांना सजविण्यात आले. सजविलेल्या बैलांच्या जोडीचे रूप पाहण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

शेतीमध्ये आधुनिक यंत्रांचा वापर वाढत असला, तरी ग्रामीण भागात बैलांचे महत्त्व आणि त्यांच्याविषयीची आत्मीयता आजही कायम आहे. बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते जपणारी परंपरा आहे. या दिवशी बैलांना शेतीच्या कामातून विश्रांती देऊन त्यांचा सन्मान केला जातो.

पूर्व आंबेगावातील गावांमध्ये पारंपरिक पद्धतीने बैलपोळा साजरा करताना ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडले. या सणामुळे गावागावांतील उत्साहाला उधाण आले असून, शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनाशी जोडलेली परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वही अधोरेखित झाले.




## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, संतोष शिवाजी भालेकर राहणार विकास हाउसिंग सोसायटी रुपीनगर तळवडे ४११०६२ पुणे

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-14 -CK-4737 असे असून सदर चार चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती रूपाली संतोष भालेकर यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-१२/१०/२०२६

**श्रीमती रूपाली संतोष भालेकर**
मुक्काम पोस्ट विकास हाऊसिंग सोसायटी रुपीनगर तळवडे पुणे ४११०६२

## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, सचिन बाळू गोरडे राहणार मुक्काम पोस्ट शिंगवे तालुका आंबेगाव जिल्हा पुणे ४१२४०६

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-14 -JW-2195 असे असून सदर दोन चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार वडील बाळू नथू गोरडे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक-१२/१०/२०२६

**श्री बाळू नथू गोरडे**
मुक्काम पोस्ट शिंगवे तालुका आंबेगाव जिल्हा पुणे४१२४०६

# आई जगदंबे, दुष्काळाचे सावट दूर कर, बळीराजासह सर्वांना सुखात ठेव

## भरपूर पाऊस पडू दे. भक्तांची प्रार्थना; शारदीय नवरात्रोत्सवाची मोहटा देवस्थानात घटस्थापना

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** सनई चौघड्याचा मंजुळ व आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करणारा निनाद, वेदमंत्रोच्चाराचा घोष, उत्साह व चैतन्यमय वातावरणात देवी दर्शनासाठी आतुर झालेले हजारो भाविक, संबळ वाद्याचा गजर व आई राजा उदे उदे, मोहटादेवी माता की जय चा जयजयकार अशा वातावरणात मोहटा देवस्थानामध्ये शारदीय नवरात्रोत्सव निमित्त पारंपारिक पद्धतीने घटस्थापना करण्यात आली.

देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा जिल्ह्याचे धर्मदाय उपायुक्त नवनाथ जगताप व त्यांच्या पत्नी सुजाता जगताप यांच्या हस्ते सर्व धार्मिक विधी पार पडले. घटस्थापना विधीचे पौरोहित्य मुख्य पुरोहित भूषण देवा साकरे, भास्कर देशपांडे, बाळासाहेब क्षीरसागर, आदी ब्रह्मवृंदांनी केले. यानिमित्त सप्तशती पाठ, देवीच्या नामजपाला संकल्प युक्त पूजनाने प्रारंभ झाला.

यावेळी देवस्थान समितीचे विश्वस्त ॲड. विक्रम वाडेकर, बाळासाहेब लाहोटी, अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, शशिकांत दहिफळे, ॲड .कल्याण बडे, ॲड प्रसन्न दराडे, आदी उपस्थित होते. शनिवारी सायंकाळपासूनच राज्याच्या विविध भागातील सुमारे दहा हजार मशालधारकांनी पारंपरिक पद्धतीने मोहोटागडावर येत देवीचा जयजयकार करत मशाल प्रज्वलित करून पायी चालत गावाकडे नेली. तेजरूपातील शक्तीचे प्रतीक म्हणून मशालीकडे पाहिले जाते. विविध स्वयंभू स्थानांवरून मशाल पेटवून गावाकडील मंदिरांमध्ये घटस्थापना करण्याची पारंपरिक प्रथा



आहे. अनेक वर्षांपासून गावोगावचे भाविक ही प्रथा जपतात. रात्रभर संपूर्ण तालुक्यात मशाली बरोबर असलेल्या वाहनांमधून वाजणारी देवीची गाणी, उत्साही तरुणांकडून होणारा देवीचा जयजयकार यामुळे नवरात्राची चाहूल सर्वत्र लागली. शासन निर्णयानुसार जिल्हा न्यायाधीश कडून धर्मदाय उपायुक्तांकडे देवस्थान समितीचा कारभार हस्तांतरित झाल्यानंतरचे पहिलेच नवरात्र असल्याने विश्वस्तांसह भाविकांनाही उत्सुकता लागली होती. पारंपरिक पद्धतीमध्ये कोणतेही बदल न करता उत्साही वातावरणामध्ये नवरात्र उत्सवाचे आयोजन देवस्थान समिती, विश्वस्त मंडळ तथा प्रशासनाकडून आयोजित झाले आहे. यंदा सर्वत्र दुष्काळाचे सावट असल्याने घटस्थापनेच्या प्रसंगी देवीपुढे संकल्प प्रार्थना करताना आदिमाया आदिशक्ती मोहटादेवीने बळीराजा वरील संकट दूर करावे, भरपूर पाऊस पाडावा, घन धान्याची समृद्धी करावी, राष्ट्राचे धर्माचे रक्षण करावे, सर्वांना सुख शांती लाभून सर्वांच्या हातून धर्मकार्य व्हावे अशा स्वरूपाची व्यापक प्रार्थना करण्यात आली.

मोहटे गावातून घटस्थापने पूर्वी देवीच्या सुवर्ण मुखवटाची व अलंकाराची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीतही भाविकांसह गावकऱ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. देवस्थान समितीतर्फे मोठ्या प्रमाणावर नियोजन पूर्ण करण्यात आले असून जिल्हा पोलीस प्रमुखांकडून मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त देण्यात आला आहे. यात्रेचे नोडल अधिकारी तथा प्रांत अधिकारी प्रसाद मते यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक प्रशासनातील सर्व यंत्रणांनी सक्रिय योगदान नोंदवले आहे.

यंदा प्रथमच तनपुरवाडी पासून सुरू होणारा जोड रस्ता पालिकेकडून मुरुमीकरण करून खड्डे बुजवण्यात आल्याने वाहन चालकांची सोय झाली आहे. यामुळे वाहतूक कोंडीला काही प्रमाणात लगाम लागला आहे. देवस्थान समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखा अधिकारी संदीप घुले यासह सर्व अधिकारी व कर्मचारी यात्रा उत्सवासाठी सज्ज झाले असून विविध मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. राज्य शासनाने दुष्काळजन्य परिस्थितीमुळे यंदा मान्यवरांच्या हारतुरे व अन्य प्रकारच्या सत्कारावर प्रतिबंध घातला आहे.

येणाऱ्या सर्व भाविकांना मोफत निवास व्यवस्था भरपूर प्रमाणात पिण्याचे पाणी, मोफत फराळ व चहापाणी व्यवस्था, आरोग्यवस्था करण्यात येऊन मुख्य मंदिरासह गडाच्या परिसरात अत्यंत आकर्षक स्वरूपाची विद्युत रोषणाई भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. घटी बसणाऱ्या भाविकांसाठी सुद्धा देवस्थान समितीकडून उत्तम प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. नवरात्र उत्सव काळात हजारो स्त्री पुरुष मंदिराच्या परिसरात विशिष्ट व्रताचे आचरण करत देवीची सेवा करतात याला घटी बसणे असे म्हणतात. सायंकाळी हजारो भाविकांकडून वाजत गाजत देवी गडाला प्रदक्षिणा घालण्यात आली.

## द•ख•ल

### पाथर्डी तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी शेलार

**करंजी :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ



यांच्या मान्यतेने अहिल्यानगर ग्रामीण दक्षिण जिल्हा काँग्रेसच्या विविध तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पाथर्डी तालुका अध्यक्ष म्हणून प्रकाश शेलार यांची निवड करण्यात आली.जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. किरण अण्णासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सृजन संघटन अभियानातून या नियुक्त्या करण्यात आल्या. प्रकाश शेलार हे पाथर्डी तालुका काँग्रेसचे युवा तालुकाध्यक्ष असताना त्यांनी तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. सुमारे बारा ठिकाणी त्यांनी युवक काँग्रेसच्या शाखा स्थापन केल्या होत्या. ग्रामीण भागातील तरुणांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणणे तसेच काँग्रेसचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी गेल्या काही वर्षांमध्ये केले होते.पाथर्डीच्या ग्रामीण भागामध्ये प्रकाश शेलार यांचे चांगला जनसंपर्क आहे तसेच तिसगाव मिरी भागामध्ये हे त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोठे काम केलेले आहे.आणि म्हणुनच काँग्रेस पक्षाने त्याची दखल घेत त्यांना पुन्हा एकदा पाथर्डी तालुका तालुकाध्यक्षपदी नियुक्त केले आहे. यावेळी बोलताना प्रकाश शेलार म्हणाले की खऱ्या अर्थाने सर्व धर्म सम भाव आणि सर्वसामान्य माणसाला जातीभेद न करता न्याय देण्याचं काम हे फक्त काँग्रेस पक्ष करू शकतो आणि म्हणूनच गेल्या काही वर्षांपासून मी काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात असून यापुढेही काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करीन तसेच जेथे गोरगरींबावर अन्याय होतो त्यासाठी झटणार असून विविध योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी मी निश्चित काम करेल.

### मतदान जनजागृती व नवमतदार नोंदणी अभियान उत्साहात संपन्न



**शेवगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहातील निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती व नवमतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका आणि नवमतदार नोंदणी प्रक्रियेविषयी जागृती करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून शेवगावच्या नायब तहसीलदार गौरी कट्टे मॅडम, मा. सुरेश बर्डे, सागर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. ए. दुकळे आणि विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. अमोल खोसे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना नायब तहसीलदार मा. गौरी कट्टे मॅडम यांनी मतदानाचे महत्त्व विशद केले. त्या म्हणाल्या की, मतदान हा लोकशाहीतील प्रत्येक नागरिकाचा महत्त्वाचा अधिकार असून, राष्ट्राच्या जडणघडणीत प्रत्येक मत मोलाचे असते. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक युवक-युवतीने आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदानाच्या राष्ट्रीय कर्तव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच नवमतदार नोंदणीची ऑनलाइन व ऑफलाइन प्रक्रिया त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर समजावून सांगितली.

## केंद्रीय मंत्री आठवले यांच्या हस्ते रसाळ यांना 'सह्याद्री कृषी रत्न पुरस्कार'

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** दैनिक राष्ट्रसह्याद्री या लोकप्रिय वृत्तपत्राचा ७ वा वर्धापन दिन दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी मराठी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात निघोज येथील युवा प्रगतीशील शेतकरी राहुल अमृताशेठ रसाळ यांचा सह्याद्री कृषी रत्न पुरस्कार केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, दैनिक राष्ट्रसह्याद्री वृत्तपत्राचे संपादक करण नवले,पूनम नवले तसेच राज्यातील आमदार खासदार व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल अमृता रसाळ हे निघोज परिसरातील शिववाडी येथील युवा प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांचा गेली १० वर्षांपासून मोठ्या प्रमाणात नावलौकिक झाला आहे. द्राक्ष, डाळींब तसेच फळबागांच्या माध्यमातून त्यांची शेती ही शेती पर्यटन म्हणून राज्यातील लोक आवर्जून पाहाण्यासाठी येत असतात. वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून ते शेती करीत असून शिववाडी



व पारनेर तालुक्यातील जवळा या गावात त्यांची मोठी शेती असून शेतीमध्ये आधुनिकीकरण करीत त्यांनी नवनवीन प्रयोग माध्यमातून शेती करण्याचा त्यांचा छंद असून राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून त्यांना पुरस्कार मिळाले असून कृषी विभागाने त्यांची महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी याठिकाणी सल्लागार मार्गदर्शक युवा शेतकरी म्हणून त्यांची गेली पाच वर्षांपूर्वी निवड केली आहे. कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकरी विकास योजनांसाठी त्यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले आहे. गेली दहा वर्षात त्यांनी १४ देशांचा अभ्यास दौरा केला असून परराष्ट्रातील शेती यांचा परिपूर्ण अभ्यास करणारे एक युवा शेतकरी म्हणून केंद्र सरकारने त्यांचा सन्मान केला आहे. वडील अमृताशेठ रसाळ व त्यांच्या कुटुंबातील आई व भाऊ यांचे सातत्याने त्यांना पाठबळ व मार्गदर्शन लाभले असून एक आदर्श प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांचा अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यात तसेच राज्यात मोठा नावलौकिक झाला आहे.

राहुल रसाळ यांनी आजपर्यंत शेती शास्रात आधुनिक पद्धतीने अभ्यास करुन राज्यातील युवा शेतकऱ्यांनी शेतीकडे वळावे यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील बहुतांश गावात लोकप्रबोधन केले. राज्यातील ज्येष्ठ आणी युवा शेतकऱ्यांचे संघटन तयार करून शेती व्यवसाय किती फायदेशीर आहे आणी राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून शेतीच्या योजनांचा अभ्यास करीत त्यांनी मोठ्या प्रमाणात लोकप्रबोधन करण्याचे काम केले आहे.

देशाचे माजी कृषीमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब तसेच राज्यातील आजी माजी कृषिमंत्री यांनी वेळोवेळी राहुल रसाळ यांच्या शेती प्रेमाचे कौतुक करीत राहुल रसाळ यांच्या सारखे युवा शेतकरी हे राज्याचे कृषी वैभव असल्याचे गौरवोद्गार व्यक्त करीत त्यांना सन्मानित केले आहे. रसाळ यांना सह्याद्री कृषी रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध संस्थाचे पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

या पुरस्काराबद्दल बोलताना राहुल रसाळ यांनी सांगितले की दैनिक राष्ट्रसह्याद्री हे वृत्तपत्र लोकप्रिय दैनिक असून संपादक करण नवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी माझी या पुरस्कारासाठी निवड केली त्याबद्दल धन्यवाद व हार्दिक आभार. आजच्या युगात युवक हे शेतीपेक्षा नोकरीला प्राधान्य देत आहे.

मात्र युवकांनी शेती केली पाहिजे तसेच आधुनिकतेची जोड देऊन कमी पाण्यात व कमी खर्चात शेती करण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत या साठी आपण प्रयत्नशील असून राज्यातील व देशातील अनेक सामाजिक संस्था,कृषी संस्था तसेच राज्य व केंद्र शासनाच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे मात्र हा पुरस्कार आपण युवा शेतकऱ्यांना समर्पित करीत असून त्यामाध्यमातून आजचा युवक शेतीकडे सर्वाधिक लक्ष देऊन आपला देश व राज्य सुजलाम सुफलाम करील हीच आपली अपेक्षा असल्याचे रसाळ यांनी यावेळी सांगितले.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन स्पर्धा संपन्न



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी व त्यांचा आनंदी आणि अर्थपूर्ण जगण्यासाठीचा दृष्टिकोन अधिक व्यापक व्हावा या उद्देशाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मानसशास्त्र विभागाच्या वतीने येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात मानसिक आजारांवर आणि मानसिक आरोग्याची निगा राखण्याबाबत उपलब्ध असलेल्या सुविधांवर आधारित एक भव्य पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत एकूण ३७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला व ३७ प्रकाराच्या मानसिक आजारांची माहिती पोस्टरच्या माध्यमातून सादर केली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन बोधेगाव येथील आबासाहेब काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मच्छिंद्र फसले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात आजच्या धकाधकीच्या युगात मानसिक आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक होतो असे मत व्यक्त करून विद्यार्थ्यांना सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. अर्जुन केळकर आणि डॉ. प्रशांत साळवे यांनी काम पाहिले. त्यांनी प्रत्येक पोस्टरचे बारकाईने निरीक्षण करून मानसिक आजारांचे गांभीर्य तसेच त्यावरील उपाय पोस्टरच्या माध्यमातून मांडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची प्रशंसा केली. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातून सर्वोत्कृष्ट तीन क्रमांक काढण्यात आले.

## देवीभोयरे अंबिका देवीच्या मंदिरात घटस्थापना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील अंबिका देवीच्या मंदिरात रविवार दि.११ रोजी सकाळी घटस्थापना करण्यात आली. केदारी कुटुंबीय गेली अनेक वर्षांपासून पुजारी म्हणून भक्तीभाव करीत आहेत. राज्यातील जागृत देवस्थान म्हणून अंबिका देवीचा महिमा राज्यात आहे. नवरात्र उत्सवात दररोज या ठिकाणी राज्यातील भावीक दर्शनासाठी येत असतात.

देवीच्या गाभाऱ्यात गावकरी समया आणून ठेवतात या समया रात्रंदिवस तेवत असतात या समयांच्या माध्यमातून आपल्या कुटुंबातील महिला भगीनी रात्रंदिवस या समया तेवत ठेऊन भक्तीभाव करीत आहे ही भावीकांची यापाठीमागील श्रद्धा व भावना आहे. देवीभोयरे ग्रामस्थ व अंबिका देवी ट्रस्ट माध्यमातून



भावीकांच्या स्वागताची जय्यत तयारी केली असून मंदीर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ग्रामअभियान ग्रामस्वच्छता माध्यमातून परिसर स्वच्छ केला आहे. देवीभोयरे या ठिकाणी तुळजापूर ते श्री क्षेत्र देवीभोयरे दिव्य ज्योतीचे आगमन झाले आहे. गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात या ज्योतीचे स्वागत केले आहे. नवरात्र उत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्र उत्सव मंडळ व समस्त ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र देवीभोयरे येथे ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान श्री अंबिका माता नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त नऊ दिवस विविध धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे. रविवार रोजी सकाळी ८ वाजता घटस्थापना करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता देवी भागवत ग्रंथ व कलश मिरवणूक, तर रात्री ९ वाजता विलास अष्टक प्रस्तुत 'आदिशक्तीचा जागर' हा कार्यक्रम संपन्न झाला आहे. दररोज महाआरती, छबिना आणि रात्री ८.३० ते ११.३० या वेळेत वृंदावन धाम येथील देवीभागवतकार सुदाम कृष्ण शास्त्रीजी महाराज यांच्या वाणीतून देवी भागवत कथेचे निरूपण होणार आहे.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात उद्योजकता परिसंवाद



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** श्री ढोकेश्वर महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने उद्योजकता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.या परिसंवादासाठी न्यू आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज पारनेर येथील प्रा.शिवाजी पठारे यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर होते. या परिसंवादामध्ये विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे महत्त्व, व्यवसायाच्या विविध संधी,स्वयंरोजगार,व्यवसाय नियोजन आणि रोजगारनिर्मिती याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.शिवाजी पठारे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधींचा विचार न करता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा.नवीन संकल्पना,आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटी यांच्या जोरावर यशस्वी उद्योजक बनता येते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव मतकर यांनी विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन उद्योजकतेच्या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करावे, असे आवाहन केले.अशा परिसंवादांमुळे विद्यार्थ्यांना व्यवसायविषयक ज्ञान मिळण्याबरोबरच स्वावलंबनाची प्रेरणा मिळते असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुदाम वीर यांनी केले त्यांनी उद्योजकता विकासामध्ये शिक्षणाची भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी व्यवसायाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याची गरज अधोरेखित केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.अंकिता भूनिया यांनी करून दिला.वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित या परिसंवादातून विद्यार्थ्यांना उद्योजकते विषयी उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. यावेळी प्राध्यापक,शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनुराधा गायके यांनी केले तर आभार प्रा.प्रियांका आंबेकर यांनी मानले.

## अथांग श्रद्धा व प्राचीन हेमाडपंथी वास्तुकलेचा अद्वितीय संगम म्हणजे भाविनिमगावची जगदंबा माता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांसोबतच राज्यभरात देवीची अनेक जागृत ठाणी भाविकांच्या गाढ श्रद्धेचा व भक्तीचा केंद्रबिंदू ठरली आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील भाविनिमगाव येथील श्री जगदंबा माता देवस्थान हे अशाच एका प्राचीन, ऐतिहासिक आणि नवसाला पावणाऱ्या जागृत देवस्थानांपैकी एक आहे.

ऐतिहासिक व हेमाडपंथी वास्तुकलेचा समृद्ध वारसा भाविनिमगावचे जगदंबा माता मंदिर हे प्राचीन हेमाडपंथी स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. मंदिराच्या शिखरावर ८० लहान-लहान सुबक कळस कोरलेले असून, विविध देव-देवता, पशुपक्षी यांच्या प्राचीन शिल्पकलेने शिखराची शोभा द्विगुणीत केली आहे.पुरातन बारव (बावडी): मंदिर परिसरात



मराठेशाहीच्या काळातील अलौकिक शिल्पकलेचा नमुना असलेली बारव आहे. दोन्ही बाजूंनी खाली जाण्यासाठी पायऱ्या असलेल्या या बारवेमध्ये वर्षभर मुबलक पाणी उपलब्ध असते. ऐतिहासिक महत्त्व जपण्यासाठी या वास्तूभोवती अलिकडेच संरक्षक कठडा उभारण्यात आला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा सहवास: मंदिर परिसरात एक पुरातन वाडा असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी या वाड्याचा जीर्णोद्धार केला होता व तो स्वतःच्या कचेरीसाठी देवस्थानाला अर्पण केला होता, असा ऐतिहासिक उल्लेख आढळतो.आधुनिक जीर्णोद्धार: मंदिरासमोर आकर्षक दीपमाळ आणि प्रशस्त सभामंडपाची नव्याने उभारणी करण्यात आली असून, होम-हवनासाठी स्वतंत्र कक्ष आणि शेजारीच महादेवाचे सुबक मंदिर आहे. मनमोहक रूप आणि धार्मिक परंपरा भाविनिमगावच्या या तांदळा (मुखवटा) स्वरूपातील देवीला भाविक वाघड्या, रेणुका व भवानी माता अशा विविध नावांनी संबोधतात. देवीचे रूप अत्यंत तेजस्वी व मनमोहक आहे:कपाळावर भाग्यदायी कुंकू, नाकात मोत्याची नथ.गळ्यात पवित्र मंगळसूत्र, चांदीचा कडा असलेला डोहाळे आणि कमरेला कंबरपट्टा अंगावर हिरवी साडी परिधान केलेले देवीचे हे साक्षात रूप पाहताच भाविकांचे मस्तक आपोआप चरणी लीन होते.

## रस्त्यांची अवस्था पाहून नागरिकांचा संतप्त सवाल!

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शहर म्हटले की चांगले रस्ते, मूलभूत सुविधा आणि नियोजनबद्ध विकास अपेक्षित असतो. मात्र, श्रीगोंदा शहरातील रस्त्यांची अवस्था पाहता हे शहर आहे की खेडेगाव, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरात मोजकेच रस्ते काही प्रमाणात तंदुरुस्त दिसतात; मात्र आता त्यांनाही खोदकामाचे ग्रहण लागले आहे. बहुतांश रस्ते खड्डे, उखडलेले पृष्ठभाग आणि दुरवस्थेमुळे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत.

**चांगल्या रस्त्यांनाही पोखरण्याचे काम सुरू!**

शहरातील काही रस्त्यांनी



नागरिकांना दिलासा दिला असतानाच विविध कामांसाठी सुरू असलेल्या खोदकामामुळे त्यांचीही अवस्था खराब होण्याची भीती निर्माण झाली आहे. रस्ता तयार करताना नियोजन कुठे जाते आणि पुन्हा खोदकाम करण्याची वेळ का येते, असा सवाल उपस्थित होत आहे. रस्ते तयार करायचे, पुन्हा खोदायचे आणि नागरिकांनी धूळ, खड्डे व वाहतुकीच्या अडचणी सहन करायच्या, असेच चक्र सुरू राहणार का?

**रस्तेच सांगतात श्रीगोंदा शहराची हद्द!**

शहरात प्रवेश करताना अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था पाहून श्रीगोंदा शहराची हद्द सुरू झाल्याचे लक्षात येते, अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. शहरातील प्रत्येक रस्ता खिळखिळा आणि खराब असल्याची भावना निर्माण होत असेल, तर शहराच्या विकासकामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी खर्च होतो, कामे केली जातात; मात्र त्यांचा टिकाऊपणा आणि दर्जा यांची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न कायम आहे.

नगरपरिषद प्रशासनाने शहरातील रस्त्यांची वस्तुस्थिती तपासून खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी.

तसेच रस्ते खोदण्यापूर्वी संबंधित कामांचे समन्वयित नियोजन करून खोदलेले रस्ते पूर्ववत करण्याची जबाबदारी निश्चित करावी. शहराच्या विकासाचा दावा केवळ कागदावर नव्हे, तर नागरिकांना चांगल्या रस्त्यांतून दिसला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

